cmyk

दैनिक
# राज्य लोकतंत्र

www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... ©email:rajyaloktantra75@gmail.com

बीड – महाराष्ट्र | वर्ष – ४ | अंक–२४३ | गुरुवार, दि.२६ डिसेंबर २०२४ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने– ६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### सदिच्छा भेटीत दडलंय काय ?

गारठून टाकणाऱ्या थंडीत नागपुरात मंगळवारी उद्धव ठाकरे व त्यांच्या २० आमदारांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची आणि सभापती राहुल नार्वेकर यांची घेतलेली भेट ही सदिच्छा भेट म्हणून सांगितली जाते आहे. १२ तारखेला दिल्लीत अजित पवार यांनी शरद पवार यांचे दर्शन घेऊन त्यांना दिलेल्या शुभेच्छा यासुद्धा सदिच्छा मानल्या जात आहेत पण 'एक तर तू राहशील किंवा मी' अशी टोकाची कडवी भाषा आणि फडणवीसांच्या शपथविधीवर बहिष्कार टाकणारी मंडळी अचानक बदलतात तेव्हा काही ना काही गडबड असतेच असते. आग असली तरच धूर येतो, अगदी तसाच प्रकार या सदिच्छा भेटीत दिसून आला आहे.

### बीडमध्ये कायदा व सुव्यवस्था राहीली नाही–थोरात



बीड–माजी मंत्री व काँग्रेसचे जेष्ठ नते बाळासाहेब थोरात यांनी बुधवारी मस्साजोग येथे सरपंच संतोष देशमुख यांच्या कुटुंबियांची भेट घेऊन सांत्वन केले. बीड जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था राहीली नसून देशमुख खून प्रकरणातील गुन्हेगारांना कठोर शिक्षा व्हावी, असे ते म्हणाले. यावेळी जिल्ह्यातील काँग्रेसचे पदाधिकारी त्यांच्यासोबत होते.

# शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कारवाई करणार

## आगामी अधिवेशनात कायदा करणार–माणिकराव कोकाटे

**नाशिक । प्रतिनिधी**

**शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांविरोधात कायदा करणार असल्याची घोषणा राज्याचे कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांनी नाशिकमध्ये केली. नव्या कायद्यात शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यांवर कठोर कारवाईची तरतूद करणार असल्याचे कोकाटे यांनी म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या फसवणूक करणाऱ्यांविरोधात कोणत्या कायद्यान्वये कारवाई करायची याची अडचण असते त्यामुळं नवा आवश्यक असल्याचे माणिकराव कोकाटे यांनी म्हटले.**

### पिकविमा घोटाळ्यांसंदर्भात लवकरच बैठक

दरम्यान, पीक विमा घोटाळ्यासंदर्भात काही भागातील तक्रारी आहेत. जिल्हाधिकाऱ्यांसोबत बैठक घेऊन आणि पीक विमा कंपन्यांच्या प्रतिनिधींशी चर्चा करु असे माणिकराव कोकाटे म्हणाले. पीक विम्याचा चुकीच्या पद्धतीने लाभ घेणाऱ्यांवर कारवाई केली जाणार आहे. पीक विमा कंपन्यांचे चुकीच्या कामात सहभागी असलेले अधिकारी कर्मचारी यांच्यावर देखील कारवाई करु, असे माणिकराव कोकाटे म्हणाले.

यावेळी बोलताना कृषी मंत्री म्हणाले, कृषी खातं संवेदनशील असून मी त्याच्या दुप्पट संवेदनशील आहे. शेतकऱ्यांचे फोन उचलले जातील, कारवाई केले जातील, न्याय दिला जाईल. वेळ पडल्यास गृहमंत्री, मुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. याशिवाय दोन्ही उपमुख्यमंत्र्यांशी बोलणार आहे. शेतकऱ्यांच्या हितासाठी कठोर कायदा केला जाईल, मंत्रिमंडळात विषय मांडला जाईल, असं माणिकराव कोकाटे म्हणाले. पोलीस अधिकारी जाणीवपूर्वक व्यापाऱ्यांना वेगळी वागणूक देतात याबाबतचं प्रकरण समोर





आल्यास कठोर कारवाई करणार असल्याचं माणिकराव कोकाटे म्हणाले. आम्ही जोपर्यंत कायदा तयार करत नाही तोपर्यंत व्यापाऱ्यांच्या नावांची यादी करता येणार नाही. त्यामुळे जोपर्यंत कायदा होत नाही तोपर्यंत कोणत्या शेतकऱ्यांनी कोणत्या व्यापाऱ्यांना शेत माल विक्री करावा याबाबतची यादी करता येत नाही. शेतकऱ्यांच्या फसवूणक टाळण्यासाठी पोलिसांनी ◀◀ पान २ वर

## थोडक्यात...

### वाळू माफिया पूर्णपणे संपणार नाही, मात्र– बावनकुळे

मुंबई– वाळू माफिया राज्याला आणि लोकांना लुटत आहेत. लोकांना दर वाढून वाळू मिळत नाही. शासनाच्या कामासाठी ही वाळू मिळत नाही. डिमांड अँड सप्लायच्या प्रमाणे लोकांना वाळू मिळेल अशी चेन निर्माण करण्याचा प्रयत्न आम्ही करू. मी असे म्हणत नाही की वाळू माफिया पूर्णपणे संपेल. मात्र आमूलाग्र बदल झालेला तुम्हाला पाहायला मिळेल, असा विश्वासही महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी व्यक्त केला आहे. जुन्या योजना आहेत आणि कालबाह्य झाले आहेत त्या संदर्भातला आढावा घेऊन पुनर्विचार करू, असेही ते म्हणाले.

### सरकार नव्हे नेत्यानेच सुरु केली लाडकी बहिण योजना


नवी दिल्ली–महाराष्ट्र आणि मध्य प्रदेशात लाडकी बहीण योजनेचा निवडणुकीत झालेला फायदा लक्षात घेत आता दिल्लीच्या विधानसभा निवडणुकांपूर्वीच दिल्लीतील केजरीवाल सरकारने महिला सन्मान योजना नावाने महिलांसाठी दरमहा १००० रुपये देण्याची योजना जाहीर केली आहे. विशेष म्हणजे त्याची नोंदणी देखील सुरु करण्यात आल्याने दिल्लीत सध्या या योजनेचीच चर्चा आहे. त्यातच, भाजप नेत्याने चक्क खासगी स्वरुपात महिलांना ११०० रुपये देत लाडली योजना सुरू केल्याचे उघडकीस आले आहे. आपच्या नेत्यांनी या घटनेचे व्हिडिओही शेअर केले आहेत. त्यामुळे आता वेगळ्याच चर्चेला उधान आले आहे.

### मंत्री सरनाईकांनी घेतली विनोद कांबळींची भेट

ठाणे : भिवंडीतील आकृती हॉस्पिटलमध्ये उपचार घेत असलेल्या भारतीय क्रिकेट संघाच्या माजी फलंदाज विनोद कांबळी यांची प्रकृती स्थिर असल्याचे डॉक्टरांनी सांगितले. दरम्यान, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या सांगण्यावरुन परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी हॉस्पिटलमध्ये भेट देऊन विनोद कांबळी यांची विचारपूस केली तसेच ख्रिसमसच्या शुभेच्छा दिल्या. मंत्री सरनाईक यांनी सांगितले की, वानर सेना या संस्थेच्या माध्यमातून जवळपास २५ लाख रुपयांची आर्थिक मदत करण्यात आली आहे. तसेच श्रीकांत शिंदे फाउंडेशनच्या वतीने ५ लाख असे एकूण ३० लाख रुपयांची मदत देण्यात आली असून ही रक्कम त्याच्या पत्नीच्या खात्यात जमा होईल.

# नगरपालिका, महापालिकेच्या निवडणुका जानेवारीनंतर होणार ?

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी सांगितला कालावधी



**नागपूर । प्रतिनिधी**

**नगरपालिका आणि महापालिकांच्या निवडणुकींचा मुहूर्त कधी असणार याबाबत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले आहे. सर्वोच्च न्यायालय जानेवारीत याबाबत निकाल देईल, असे आम्हाला वाटत असून त्यावेळी न्यायालय जो वेळ त्या तारखांना निवडणुका पार पडतील, असे फडणवीस म्हणाले. माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांच्या शतकीय जयंती वर्षानिमित्त नागपुरात आयोजित कार्यक्रमानंतर पत्रकार परिषदेत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस ते बोलत होते. यावेळी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यासह विदर्भातील मंत्री आणि नवनिर्वाचित भाजप आमदार उपस्थित होते.**

राज्यातील विधानसभांच्या निवडणुका संपन्न होऊन नवीन सरकार स्थापन झाले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील महायुती सरकारचा मंत्रिमडळ विस्तार होऊन पहिले अधिवेशनही पार पडले. त्यामुळे, लोकसभा, ◀◀ पान २ वर

### विरोधकांनी बीड जिल्ह्यात जरुर जावे, पण..

बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांची निर्घृण हत्या झाल्यानंतर या जिल्ह्यातील वाढत्या गुन्हेगारीचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे. बीड जिल्ह्याला नुकतीच राष्ट्रवादीचे नेते शरद पवार आणि इतर नेत्यांनी भेट देत देशमुख कुटुंबियांचे सांत्वन केले आहे. या संदर्भात राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महत्वाचे विधान केले आहे. बीड जिल्ह्यात विरोधी पक्ष नेत्यांनी जाण्यात काहीच हरकत नाही. परंतू तेथे जाऊन कोणी राजकारण करु नये. बीड जिल्ह्याचे पर्यटन करु नये असे आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले आहे. या जिल्ह्याची बदनामी आता करु नये. गेल्या काही दिवसात तिथे घडलेल्या घटना या गंभीर जरुर आहेत. तेथे आमचे ज्येष्ठ मंत्री अजित पवार जाऊन परिस्थिती पाहून आले आहेत. सर्वच ठिकाणी मुख्यमंत्री पोहचताचे असे नाही. बीडच्या परिस्थितीबाबत योग्य ती कारवाई सुरु आहे. दोषी कोहीही असला तरी त्याला सोडले जाणार नाही असेही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### बीडच्या पालकमंत्रीपदाबाबत मुख्यमंत्र्यांचे मोठे विधान

आता पालकमंत्री पदाबाबत नागपूर येथे बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्पष्टपणे सांगितले की मुख्यमंत्री कुठल्याही जिल्ह्याचे पालकत्व ठेवत नसतात. आमचे प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावणकुळे सर्व घटक पक्षांशी बोलून पालकमंत्री पदाचा निर्णय घेतील. पत्रकारांनी यावेळी बीडचे पालकमंत्री होण्याची मागणी होत आहे असा प्रश्न केला. यावर बोलताना ते म्हणाले की, मला जर बीडचे पालकमंत्री केले तर मी अवश्य ते स्वीकारेल परंतू मला स्वत:ला गडचिरोलीचे पालकमंत्री व्हायला आवडेल असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी म्हटले आहे.

### सायबर गुन्हेगारीचे मोठे आव्हान

सायबर गुन्हे हे आपल्या सर्वांसमोरच मोठे आव्हान आहे. तंत्रज्ञान सर्वांपर्यंत पोहोचले आहे. काही लोक याचा दुरुपयोग करतात. यासंदर्भात सायबर जनजागृती कॅम्पेन केले जात आहे. देशातला सर्वात मोठा सायबर प्लॅटफॉर्म आम्ही महाराष्ट्रात तयार केलाय. चुकीच्या पद्धतीने एखादी गोष्ट आपण एक्स, व्हॉट्सअॅप, फेसबुकवर टाकली ती त्याची डिजिटल फूटप्रिंट आपल्याला मिळते. खोट्या गोष्टी फॉरवर्ड करणारे आपण सहगुन्हेगार होतो. खोट्या गोष्टी लोकांनी फॉरवर्ड करु नये, असे आवाहन फडणवीस यांनी केले.

# रामटेक बंगला पंकजा मुंडेंना मिळणार

## मुख्यमंत्र्यांकडे बंगला बदलून मागितला–बावनकुळे





**मुंबई । प्रतिनिधी**

मंत्र्यांच्या बंगल्यापैकी रामटेक हा बंगला यश –अपयशामध्ये अडकून पडला असून महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी हा बंगला नको, मला दुसरा बंगला द्या अशी मागणी मुख्यमंत्र्यांकडे केली आहे. तर रामटेक बंगला घेण्याची तयारी पंकजा मुंडे यांनी दर्शवली असल्याने त्यांना आता हा बंगला देण्यात येणार आहे. ◀◀ पान २ वर

### रामटेकमध्ये राहील्यावर हे झाले मुख्यमंत्री

रामटेक बंगल्यात वास्तव्य केल्यावर १९७८ साली शरद पवार यांनी बंड करीत ते मुख्यमंत्री झाले होते. तसेच विलासराव देशमुख सुध्दा याच बंगल्यात राहील्यानंतर मुख्यमंत्री झाले होते. शिवाय शिवाजीराव पाटील निलंगेकर सुध्दा रामटेकमध्ये राहील्यानंतरच मुख्यमंत्री झाले. गोपीनाथ मुंडे यांची सुध्दा रामटेकमध्ये राहील्यानंतरच राष्ट्रीय स्तरावर पोहचले होते.

# हत्येचा खरा तपास करायचा आहे, तर या लोकांचे सीडीआर काढा

## खा.सोनवणे यांची पत्रकार परिषदेत मागणी



**बीड । प्रतिनिधी**

**संतोष देशमुख खून प्रकरणाचा खरा तपास करायचा आहे, तर गुन्हेगारांचे सीडीआर काढा, अशी मागणी खा. बजरंग सोनवणे यांनी पत्रकार परिषदेत केज येथे केली.**

खा. सोनवणे पुढे म्हणाले, बीड जिल्ह्यातील मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येच्या प्रकरणाने राज्यातील ढासळत्या कायदा–सुव्यवस्थेचा प्रश्न चव्हाट्यावर आला आहे. ही हत्या आर्थिक व्यवहारातून झाल्याचे मंत्री धनंजय ◀◀ पान २ वर


# बीड आहे की गँग ऑफ वासेपूर; १० महिन्यात ३६ खून

**बीड । प्रतिनिधी**

**गेल्या महिनाभरापासून राज्यात बीड जिल्हा चांगल्या नव्हे तर वाईट गोष्टींमुळे गाजत आहे. बीड जिल्हा आहे की गँग ऑफ वासेपूर सिनेमातील वासेपूर असा प्रश्न विचारायची वेळ आली आहे. कारण जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या गेल्या १० महिन्यांच्या कालावधीत बीड जिल्ह्यात ३६ खून झाल्याची नोंद पोलीस ठाण्यात झाली आहे. यामध्ये मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख आणि परळी तालुक्यातील मरळवाडीचे सरपंच बापू आंधळे यांच्या खूनाचा समावेश आहे.**

सरपंच संतोष देशमुख खून प्रकरणानंतर बीड जिल्ह्याची काळी ◀◀ पान २ वर

# आ.धसांनी राजकीय पोळी भाजण्यासाठी चुकीचे आरोप करू नयेत– अमोल डुबे



## धनंजय मुंडे, पंकजाताई मुंडे, सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी धीर दिला

परळी । प्रतिनिधी

डिसेंबर रोजी काही गुन्हेगारांनी माझे अपहरण केले होते, त्यानंतर माझ्या कुटुंबाने संपर्क करताच ना.धनंजय मुंडे, ना.पंकजाताई मुंडे, आ.सुधीरभाऊ मुनगंटीवार यांनी पोलिसांना सूचना करून माझी लवकरात लवकर सुटका केली. मात्र या घटनेचा आधार घेत आ.सुरेश धस यांनी पिडीत डुबे कुटुंब ◀◀ पान २ वर

## बाजारभाव

**कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड,दि.२५ डिसेंबर २०२४**

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| आवक | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २.५० क्विंटल | २,६०० | २,६०० | २,६०० |
| ज्वारी/हायब्रिड: २५.५० क्विंटल | २,०६१ | २,३५१ | २,१९६ |
| मका/लोकल: ७.०० क्विंटल | २,१५० | २,१५० | २,१५० |
| तूर : १२.०० क्विंटल | ६,५०१ | ७,३२१ | ६,९३६ |
| उडीद : ६.५० क्विंटल | ५,५०० | ५,५०० | ५,५०० |
| बाजरी: ११.५० क्विंटल | १,९६१ | ३,३७० | २,४२५ |
| मुग : ६.५० क्विंटल | ६,९१० | ६,९१० | ६,९१० |
| सोयाबीन: ११९.०० क्विंटल | ४,०५० | ४,१११ | ४,०९० |
| हरभरा: ४.०० क्विंटल | ५,८०० | ५,८०० | ५,८०० |

# भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या सदस्यांची पाचही बोटं तुपात!

## पैसे काढताना सुद्धा असा फायदा होणार, जमा रक्कमेवर अधिक व्याज मिळणार

**नवी दिल्ली । वृतसंस्था**

**कर्मचारी भविष्य निर्वाह निधी संघटनेने सदस्यांना मोठी मोठे गिफ्ट दिले आहे. देशातील जवळपास ७.५० कोटी सक्रिय सदस्यांना हा मोठा दिलासा आहे. प्रोव्हिडंट फंडमध्ये पैसे जमा करतानाच नाही तर आता पैसे काढताना सुद्धा भरभक्कम व्याज मिळेल. त्यामुळे सदस्यांची पाचही बोटे तुपात असून पैसे**




**काढतानाही फायदा होणार आहे.** जवळपास ७.५० कोटी सक्रिय सदस्यांना प्रोव्हिडंट फंडमध्ये पैसे जमा करतानाच नाही तर पैसे काढताना पण भरभक्कम व्याज मिळणार आहे. ईपीएफओने क्लेम सेटलमेंट दरम्यान जास्त व्याज देण्याचा निर्णय घेतला आहे. या संबंधीच्या नियमात मोठा बदल करण्यात आला आहे. इतकेच नाही तर सध्या दावा निकाली काढण्यासाठी १० ते १५ दिवसांचा ◀◀ पान २ वर

### १० वर्षांत नोकरी केल्यानंतर पेन्शन मिळण्यासाठी पात्र

जर कर्मचारी ईपीएफओमध्ये दरमहा योगदान देत असेल आणि त्याने १० वर्षे नोकरी केली तर तो पेन्शनसाठी पात्र ठरतो. ही पेन्शन त्याला वयाची ५८ वर्षे पूर्ण झाल्यावर देण्यात येते. ५० वर्षांनंतर सुद्धा पेन्शन मिळू शकते. पण त्यामध्ये नियमानुसार कपात होते.

### मुदत वाढवली

केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारमण यांनी एक नवीन रोजगार लिंक्ड इन्सेटिव्ह योजनेची घोषणा केली होती. या योजनेचा लाभ घेण्यासाठी युएएन सक्रिय आणि बँक खात्याला आधारशी जोडणे अनिवार्य आहे. आता या दोन्ही प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी १५ जानेवारी, २०२५ रोजीपर्यंत मुदत वाढवण्यात आली आहे. ही अंतिम मुदत या दोन महिन्यात दोनदा वाढवण्यात आली.

cmyk

## अग्रलेख

# समांतर सिनेमाचा शहेनशह

चित्रपटांना केवळ करमणुकीचे साधन न मानता प्रेक्षकाला विचारप्रवण बनविण्याचे प्रभावी साधन मानणारे, समांतर सिनेमा लोकप्रिय करणारे, गंभीर असो की हलकेफुलके कथानक तितक्याच समर्थपणे हाताळणारे आणि आपले वेगळेपण ठसविणारे प्रयोगशील दिग्दर्शक श्याम बेनेगल यांचे सोमवारी संध्याकाळी निधन झाले. ते ९० वर्षांचे होते. त्यांच्या निधनाने चित्रपटसृष्टीवर शोककळा पसरली आहे. १४ डिसेंबरला त्यांनी वयाची ९० वर्षे पूर्ण केली होती. ब-याच दिवसांपासून किडनीच्या विकाराने ते त्रस्त होते. मुंबईतील वोक्हार्ट रुग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते.

त्यांच्या पश्चात पत्नी नीरा आणि कन्या पिया असा परिवार आहे. श्यामसुंदर श्रीधर बेनेगल यांचा जन्म त्रिमुलागिरी, हैदराबाद येथे झाला. त्यांचे वडील श्रीधर बेनेगल हे उत्तम छायाचित्रकार होते. श्याम बेनेगल यांना लहानपणापासूनच चित्रपटांची आवड होती. पालकांकडूनही त्यांना प्रोत्साहन मिळाले. अर्थशास्त्राची पदव्युत्तर पदवी प्राप्त केल्यानंतर बेनेगल यांनी मोठ्या जाहिरात संस्थेत लेखनाचे काम केले. त्यानंतर जाहिरातपट आणि लघुपट यासाठी लेखन करतानाच त्यांनी या क्षेत्रातील तांत्रिक अंगांचा सखोल अभ्यास केला. होमी भाभा अधिछात्रवृत्ती घेऊन त्यांनी बोस्टन आणि न्यूयॉर्क येथील दूरदर्शन माध्यमांसाठी लहान मुलांचे लघुपट तयार केले. त्यानंतर त्यांनी भारतात येऊन 'अंकुर' हा पहिला चित्रपट तयार केला.

त्यांच्या पहिल्याच चित्रपटाला राष्ट्रीय पुरस्कार मिळाला. कलात्मक, समांतर चित्रपट आणि व्यावसायिक चित्रपट यांची सांगड घालण्याचे महत्त्वपूर्ण काम बेनेगल यांनी केले. एनएफडीसीसाठी त्यांनी काम केले. तसेच पुण्यातील राष्ट्रीय चित्रपट आणि दूरचित्रवाणी संस्थेत त्यांनी अध्यापन केले, या संस्थेचे अध्यक्ष म्हणूनही त्यांनी काम पाहिले. स्वातंत्र्योत्तर काळात पन्नाशीच्या दशकातच सुरू झालेली समांतर चित्रपटांची चळवळ सत्तरीच्या दशकामध्ये लोकप्रिय करण्याचे महत्त्वाचे काम बेनेगल यांनी केले. बेनेगल, गोविंद निहलानी, महेश भट्ट यांच्यासारखे दिग्दर्शक, स्मिता पाटील, शबाना आझमी, नसिरुद्दीन शाह, ओम पुरी, दीप्ती नवल, फारूख शेख अशा ताकदीच्या कलाकारांनी सामान्य चित्रपटरसिकांना उथळ मनोरंजनाच्या पलिकडील जग दाखवणा-या समांतर चित्रपटांकडे खेचून आणले. समांतर चित्रपट केवळ बुद्धिमान प्रेक्षकांसाठी असतात, सर्वसामान्यांना त्यात फारशी रुची निर्माण होऊ शकत नाही असे अनेक समज त्यांनी खोडून काढले. तरुण वयातच बेनेगल यांनी चित्रपटनिर्मिती सुरू केली. चित्रपटांच्या आवडीतून त्यांनी हैदराबाद फिल्म सोसायटी स्थापन केली. श्याम बेनेगल हे समांतर सिनेमाचे ब्रँड ॲम्बॅसेडरच होते. 'अंकुर', 'निशांत', 'मंथन', 'भूमिका', 'जुनून' असे अनेक चित्रपट त्यांनी दिले. 'अंकुर'मधून शबाना आझमीची हिंदी चित्रपटसृष्टीला ओळख झाली. बेनेगल यांना १८ राष्ट्रीय पुरस्कारांनी गौरवण्यात आले होते. 'महाभारत' या संकल्पनेवर त्यांनी दिग्दर्शित केलेला 'कलयुग' हा सिनेमा आजही वाखाणला जातो. सर्वाधिक राष्ट्रीय पुरस्कार मिळवण्याचा विक्रम श्याम बेनेगल यांच्या नावावर आहे. त्यांना १९७६ मध्ये 'पद्मश्री' आणि १९९१ मध्ये भारताचा तिसरा सर्वोच्च नागरी पुरस्कार 'पद्मभूषण' देऊन सन्मानित करण्यात आले होते. तसेच एक फिल्मफेअर पुरस्कार आणि नंदी पुरस्कारानेही त्यांना गौरविण्यात आले आहे.

त्यांनी ५० वर्षांहून अधिक काळ भारतीय सिनेविश्वाची सेवा केली. २००५ साली त्यांना दादासाहेब फाळके पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. देशाचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या 'डिस्कव्हरी ऑफ इंडिया' या पुस्तकावर आधारित 'भारत एक खोज' या दूरदर्शनवरील महत्त्वाकांक्षी मालिकेचे दिग्दर्शनही त्यांनी केले होते. 'सरदारी बेगम' हा त्यांचा उर्दू सिनेमाही गाजला होता. श्याम बेनेगल यांनी २४ चित्रपट, ४५ माहितीपट आणि १५ पेक्षा जास्त जाहिरातपर चित्रपट बनवले आहेत. 'झुबैदा', 'द मेकिंग ऑफ द महात्मा', 'नेताजी सुभाषचंद्र बोस : द फॉरगॉटन हिरो', 'मंडी', 'आरोहण', 'वेलकम टू सज्जनपूर' यासारखे डझनभर उत्तम चित्रपट त्यांनी दिले. बेनेगल यांनी भारतीय चित्रसृष्टीला नसिरुद्दीन शाह, ओम पुरी, अमरीश पुरी, अनंत नाग, शबाना आझमी, स्मिता पाटील असे उत्तम कलाकार दिले. बेनेगल यांचा पहिला चित्रपट 'अंकुर' हा अस्पृश्यता, जमीनदारी या विषयावर आधारित होता. तो काही प्रचारकी सिनेमा नव्हता, पण ती कथा समाजव्यवस्थेतील भेदावर आधारित होती.

'निशांत'मध्ये सरंजामशाही विषयावरील कथा होती. आपण त्या व्यवस्थेत पूर्णतः अडकलो होतो. 'मंथन' हा सहकाराची ताकद दाखवणारा सत्य परिस्थितीवर आधारित चित्रपट होता. आपल्या देशाला पुढे जाण्याचा सहकार हा मार्ग असू शकेल, हे सुचवणारी ती कथा आहे. हे सर्व देशाच्या विकासाशी, लोकांच्या प्रश्नाशी भिडलेले विषय होते. याचा अर्थ असा नव्हे की बेनेगल फक्त समस्यांवर आधारित चित्रपट बनवू इच्छित होते पण त्यांच्या अंगात जे मुरलेले होते ते आपोआपच बाहेर पडत होते. त्यांच्याकडून केवळ मनोरंजनात्मक चित्रपट निर्माण होणे त्यामुळे शक्य नव्हते. सत्यजित रे यांचा 'पथेर पांचाली' बघितल्यानंतर बेनेगल यांना त्यांचा आवाज सापडला. केवळ मनोरंजनात्मक सिनेमे बनवण्यापेक्षा त्यांना स्वत:चे वेगळे असे काहीतरी बनवायचे होते, ज्याचा वास्तवाशी संबंध असेल, लोकांच्या ख-या आयुष्याच्या धाग्याची ज्यात वीण असेल. बेनेगल यांना कोणाचेही केवळ अनुकरण करायचे नव्हते तर स्वत:चे जगणे, आलेले अनुभव याची घुसळण होऊन जे बाहेर निघेल त्यातून स्वत:चा मार्ग शोधायचा होता.

प्रेक्षकांना चित्रपटाची कथा आपली वाटायला हवी असा त्यांचा प्रयत्न होता. म्हणून त्यांनी केवळ सवंग करमणुकीसाठी भडक नाट्यमयता आपल्या चित्रपटातून वापरली नाही. आपला सिनेमा हा आशावादी विचार मांडत संपावा याबद्दल ते आग्रही होते. बेनेगल यांच्या चित्रपटांचे विषय, त्यांची वास्तवदर्शी मांडणी आणि प्रस्थापित कलाकारांऐवजी नवख्या कलाकारांना दिलेली संधी यामुळे प्रेक्षकांना भावले. बेनेगल यांनी दिग्दर्शक म्हणून स्वत:ला मर्यादित ठेवले नाही. आपल्या कारकीर्दीत त्यांनी सुमारे ९०० हून अधिक जाहिराती केल्या. माहितीपट आणि लघुपटांच्या दिग्दर्शनातही ते मनापासून रमले. श्याम बेनेगल यांच्या जाण्याने भारतीय चित्रपटसृष्टी आणि दूरचित्रवाणीचा वैभवशाली अध्याय संपुष्टात आला आहे. भारतीय चित्रपटसृष्टीची दिशा बदलणारा माणूस म्हणून ते स्मरणात राहतील. बेनेगल यांना भावपूर्ण आदरांजली.

## गौणखनिजाची विनारवानगी वाहतूक केल्यास पाच पट दंड-तहसीलदार वैशाली पाटील

**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोणत्याही नागरिकास मुरूम, माती, दगड वाहतूक करणे असल्यास त्याकरिता महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम ४८ (७) अन्वये निर्धारित ब्रास पर्यंतची परवानगी तहसील स्तरावरून देता येते. सबब याकरिता सर्वसामान्य व्यक्ती महाखनिज मध्ये अर्ज करू शकतात. यामध्ये कोणत्याही प्रकारची फी आकारली जात नाही. आपल्या अर्जावर पडताळणी केलेनंतर तात्काळ महाखनिज वर चलन भरून आपणांस परवानगी देता येते. याकरिता कोणत्याही एजंट, अथवा दलाल यांची आवश्यकता नसून आपण कार्यालयात संपर्क साधून आपली परवानगी मिळवू शकता. जर तालुक्यात विना परवाना गौणखनिजाची वाहतूक करतांना आढळल्यास चालू बाजारभावाच्या (५) पाच पट दंडाची आकारणी तसेच वाहनांवर दंडात्मक कार्यवाही करण्यात येईल. सबब तालुक्यातील सर्वच नागरिकांनी रितसर परवानगी घेवूनच मुरूम, माती, दगड याची वाहतूक करण्यात यावी असे प्रसिद्धी पत्रक तहसीलदार वैशाली पाटील यांनी काढले आहे.



## पालक शिक्षक यांच्यासमोर सध्या एकच प्रश्न मुलांना मोबाईलच वेड लागलय...

आजकाल प्रत्येक कुटुंबामध्ये मोबाईलचा अतिरेकी वापर हा एक गंभीर प्रश्न बनला आहे. विशेषतः लहान मुलांमध्ये मोबाईल आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या () तंत्रज्ञानाबद्दल आकर्षण वाढत आहे. मात्र, हा वाढता मोबाईलचा प्रभाव त्यांच्या शारीरिक, मानसिक आणि बौद्धिक आरोग्यास हानी पोहोचवतो आहे.

**मोबाईल वापराचे दुष्परिणाम:**

**१. वाचन आणि विचार करण्याची क्षमत कमी होणे:**

मोबाईलचा अतिरेकी वापर मुलांमध्ये तर्कबुद्धीचा विकास खुंटवतो. पूर्वी जे काम विचार करून वाचनातून केले जायचे, ते आता शॉर्टकट आणि त्वरित उत्तरांसाठी मोबाईलवर अवलंबून झाले आहे.

**२. शारीरिक आरोग्य:**

मोबाईलमुळे मुलांमध्ये डोळ्यांचे विकार, स्थूलता, पाठदुखी, आणि झोपेच्या समस्या निर्माण होतात.

**३. भावनिक परिणाम:**

मोबाईलचा सततचा वापर मुलांमध्ये चिडचिड, एकलकोंडेपणा, आणि संवाद



कौशल्यात कमतरता निर्माण करतो.

**४. शाळेतील कामगिरीवर परिणाम:**

अभ्यासाकडे दुर्लक्ष होत असल्याने शैक्षणिक प्रगती कमी होते.

**पालकांनी काय करावे?**

**१. मोबाईलसाठी वेळेची मर्यादा ठरवा:**

मुलांसाठी एक ठराविक वेळेच्या मर्यादेतच मोबाईल वापराची परवानगी द्यावी. उदाहरणार्थ, केवळ शनिवार-रविवार १-२ तास.

**२. संवादाला प्रोत्साहन द्या:**

मुलांशी संवाद साधा. त्यांच्याशी त्यांचे विचार, अडचणी, आणि आवडीच्या विषयांवर चर्चा करा. संवादामुळे मोबाईलचा मोह कमी होतो.

**३. शारीरिक क्रियाकलापांमध्ये सहभागी करा:**

मुलांना मैदानी खेळ, योगा किंवा इतर शारीरिक उपक्रमांसाठी प्रेरित करा. यामुळे त्यांना मोबाईल विसरण्यास मदत होईल.

**४. शिक्षक आणि पालक यांची भूमिका:**

शाळांमध्ये मोबाईल प्रबोधन कार्यक्रम आयोजित करून मुलांना मोबाईलच्या अतिरेकी वापराचे दुष्परिणाम समजावून सांगितले पाहिजेत.

**५. आधुनिक तंत्रज्ञानाचा सकारात्मक वापर शिकवा:**

मुलांना मोबाईलचा शैक्षणिक आणि उपयुक्त कामांसाठी कसा वापर करायचा हे शिकवा. तंत्रज्ञानाचा योग्य प्रकारे वापर करणे ही काळाची गरज आहे.

**शाळांमध्ये प्रबोधन गरजेचे:** शाळांनी मोबाईलविरोधी मोहिमा राबवल्या पाहिजेत. 'डिजिटल डीटॉक्स'सारख्या संकल्पना शिकवून मुलांना किमान पहिली ते दहावीपर्यंत मोबाईलचा वापर मर्यादित ठेवावा यावर भर दिला पाहिजे. शाळांमध्ये निम्न गोष्टी प्रभावी ठरू शकतात: साप्ताहिक चर्चासत्रे आयोजित करणे. मोबाईल मुक्त दिवस साजरा करणे. मुलांना मैदानी खेळांमध्ये सहभागी होण्यासाठी प्रोत्साहन देणे.

**पालकांसाठी सल्ला:** मुलांसमोर स्वतः मोबाईलचा मर्यादित वापर करा. पालकांनी स्वतः योग्य उदाहरण ठेवले तर मुलं त्याचे अनुकरण करतात. एकत्र जेवताना किंवा कुटुंबीयांबरोबर वेळ घालवताना मोबाईल बंद ठेवा. मुलांना पुस्तके वाचायला लावा, त्यांच्यासोबत खेळ खेळा किंवा कुटुंबीयांसोबत विविध उपक्रम राबवा. **निष्कर्ष:** मोबाईलचा योग्य वापर शिक्षण आणि मनोरंजनासाठी उपयुक्त ठरतो, परंतु अतिरेक हा नेहमीच घातक ठरतो. पालक, शिक्षक आणि समाज यांची जबाबदारी आहे की ते मुलांना मोबाईलचा संतुलित आणि सकारात्मक उपयोग कसा करायचा हे शिकवतील. तसेच, मुलांना मानसिक, बौद्धिक, आणि शारीरिक विकासासाठी योग्य दिशा देऊन त्यांचे भविष्य घडवतील.

**सुरेश यादव**

## पर्यायी रस्त्यामुळे वाहतूक कोंडीचा प्रश्न निकाली निघण्यास मदत होईल- आ.अर्जुनराव खोतकर

**जालना । प्रतिनिधी**

**शहरात होत असलेल्या पर्यायी रस्त्यामुळे वाहतूक कोंडीतून वाहनधाराकांची सुटका होणार असून विकासाची ही सर्व कामे आपण पूर्ण करुन घेऊत, निधीची चिंता करण्याचेही कारण नाही, असे प्रतिपादन आ. अर्जुनराव खोतकर यांनी येथे बोलतांना केले.**

आ.श्री.खोतकर यांच्या प्रयत्नाने मंजूर झालेल्या ६७ कोटींपैकी आज बुधवारी भिमराज प्रवेश व्दार ते जयनगर चौकापर्यंतच्या १५ मिटर रुंद सिमेंट रस्ता बांधकामासाठी चार कोटी ६९ लक्ष ७० हजार रुपये, राष्ट्रमाता महाविद्यालय ते रेल्वे उड्डाणपुलातपर्यंतच्या सिमेंट रोडचे बांधकाम करण्यासाठी ३ कोटी ५० रुपये आणि आरपी रोड ते अग्रसेन फाऊंशेडन म्हणजेच अब्दुल हमीद चौकापर्यंतच्या (कॉलेज रोड) सिमेंट रस्त्याच्या बांधकामासाठी २ कोटी १५ लक्ष रुपयांच्या या कामांचा उद्घाटन सोहळा आ. श्री. खोतकर यांच्या हस्ते पार पडला. त्याप्रसंगी आ. श्री. खोतकर बोलत होते. यावेळी माजी आ. अरविंदराव चव्हाण, माजी जि. प. अध्यक्ष अनिरुध्द खोतकर, माजी नगराध्यक्ष भास्करराव अंबेकर, ॲड. ब्रम्हानंद चव्हाण, पंडीतराव भुतेकर, राजेश राऊत, अभिमन्यू खोतकर, भाऊसाहेब घुगे, फिरोजलाला तांबोळी, ॲड. सुनिल किनगावकर, विष्णू पाचफुले, आत्मानंद भस्त, ॲड. भास्करराव मगरे, अमोल ठाकुर, शौळेश घुमारे, संतोषराव मोहिते, गणेशराव सुपारकर, डॉ. सुयोग कुलकर्णी, कालिंदाताई ढगे, सौ. सवितातार्स किवंडे, उज्जलाताई फोपलिया, शेख जावेद, दिनेश भगत, दिपक वैद्य, श्रीकांत पांगारकर, कुणाल जावधव, जफर खान पठाण, योगेश रत्नपारखे, कमलेश खरे आदींची उपस्थीती होती. पुढे बोलतांना आ. श्री. खोतकर म्हणाले की, आपण शहर विकासाच्या प्रश्नावर सातत्याने केंद्रित राहणार आहोत. तसेच जालना शहरातील पाणीपुरवठा सुरळीत



करण्यासाठी प्रयत्नशील आहे. असे सांगून ते म्हणाले की, जालना शहरातील खुल्या जागांचा विकास करण्यात येणार आहे. मोती तलाव व मुक्तेश्वर तलाव सौंदर्य करण्याचे कामे हाती घेण्यात आली आहेत. मुक्तेश्वर प्रवेशद्वार ते भाऊ साठे पुतळा व राष्ट्रमाता कॉलेज ते उड्डाण पुलापर्यंतच्या रस्त्याला करोडो रुपये खर्च होणार आहेत. त्यामुळे हे काम अत्यंत उत्कृष्ट पध्दतीने होणार आहे. या दोन्ही पर्याय रस्त्याचा मोठा फायदा शहरातील वाहतुक सुरळीत होण्यावर होणार आहे. अनेक वर्षापासून रखडलेला कॉलेज रोडचा प्रश्न अखेर आपण आमदार झाल्यानंतर मार्गी लागला असल्याचेही ते म्हणाले. या कार्यक्रमास सौ. वैशाली जांगडे, सौ. रंजना गोगडे, किशोर पांगारकर,निखील पगारे, विठ्ठल बनकर, रामअप्पा सतकर,संताजी वाघमारे, महेश दुसाने, मेघराज चौधरी, विजय जाधव, राहुल हिवराळे, रमेश टेकुर, नरेश खुदभैय्ये, राजू माधवले, संजय गायकवाड, अमोल राऊत, नजीरभाई, भोला कांबळे, लखन कणिसे, दिपक राठोड, मनोज लाखोले, जगदिश रत्नपारखे, दिनेश पाटील, सागर पाटील, शुभम टेकाळे, किशोर शिंदे, विक्रम कुसुंदल, अक्षय आटोळे, भूषण बनकर, अभिषेक काबलिये, सतोष परळकर, संजय डुकरे, प्रदीप गायकवाड, नेल्सन कांबळे, रवींद्र बुंदेले, किरण सिरसाठ, मयुर एखंडे, मनोज धानुरे, गोविंद सोनुने, सुशिल भावसार, ताहेर खान, ॲड. अशपाक पठाण, सगीर पहेलवान, ॲड. बबनराव मगरे, संदीप साबळे, सुनिल रत्नपारखे, अंकुश पाचफुले, शिवसिंग तिलवारवाले, शरद ढाकणे, आकाश जगताप, शिवा कोरे, सौरभ भिसे, मुसाभाई परसुवाले व प्रभागातील नागरीक, महिला, युवक, युवती मोठ्या संख्येने उपस्थित होते. तसेच या कार्यक्रमास महानगर पालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, अतिरिक्त आयुक्त प्रियंका राजपुत, उपायुक्त नंदा गायकवाड, शहर अभियंता सय्यद सऊद आणि गुत्तेदार एस. जी.देविदान इंफ्रा प्रा. लि. व शुभम्? कंन्स्ट्रक्शन आदींची उपस्थिती होती.

## आष्टीत एक गाय व चार बैल पोलिसांनी पकडले; पोलिसांची कारवाई

**आष्टी । प्रतिनिधी**

आष्टी पोलिसांनी केलेल्या कारवाईत कत्तलीसाठी आणलेल्या ३ लाख १० हजार रूपये किमतीचे ४ गोवंश व एक गायी धाड टाकून पकडण्यात आल्या आहेत. पोलिसांनी कारवाई केल्याने शहरात खळबळ उडाली आहे. आष्टी पोलिस सूत्रानुसार, पोलीस निरीक्षक शरद भुतेकर यांना गुप्त माहिती मिळाली होती की,आष्टी शहरातील फत्तेशाह बुखारी दर्ग्या जवळ असलेल्या वेड्या बाभळीच्या झाडा झुडपात गोवंश कत्तलीसाठी व विक्रीसाठी आणून बांधलेले आहेत.ही महिती पोलिसांना मिळाल्यानंतर सोमवार दि.२४ रोजी सायंकाळी ६ वा.सुमारास पोलीस उपनिरीक्षक धनवडे पोलीस नाईक प्रविण क्षीरसागर,पोलीस शिपाई तांबे,पोलीस शिपाई सय्यद यांनी कारवाई करत मिळालेल्या माहितीनुसार आष्टी शहरातील फत्तेशाह बुखारी दर्ग्या जवळ असलेल्या मोकळ्या मैदानात झाडा झुडपाच्या ठिकाणी धाड टाकली. त्याठिकाणी त्यांना एक गायी व तीन बैल अशी एकूण ५ जनावरे आढळून आले.त्यांची किंमत साधारपणे ३ लाख १० हजार रूपये एवढी असल्याचे सांगितले जाते.या जनावरांबाबत अधिक चौकशी केली असता,गोवंश मार्केट कमिटीचा परवाना नसताना कत्तलीसाठी व विक्रीसाठी ही जनावरे आणली असल्याचे समोर आल्याने पो.काँ.अशोक नानासाहेब तांबे यांच्या फिर्यादीवरून आरोपी शाकीर युसुफ कुरेशी (५१) रा. कुरेशी गल्ली,आष्टी या दोघांविरोधात महाराष्ट्र प्राणी रक्षण कायद्याचे उल्लंघन करत प्राण्यांना क्रुररतेने वागणूक देण्यास प्रतिबंध करणाऱ्या कायद्याप्रमाणे मजकुराच्या लेखी फिर्यादीवरून गुन्हा दाखल करण्यात आला आहे.पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक धनवडे हे करत आहेत.कत्तलखान्यात विक्रीसाठी जाणारे ५ गोवंश पकडले.

## पान १ वरून...

### शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या

कारवाई कशी करावी याबाबतचा निर्णय पोलीस दलातील अधिकाऱ्यांना घ्यावा, अशा सूचना दिल्या आहेत, असे माणिकराव कोकाटे म्हणाले. शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्यांविरोधात कारवाई करणारा कायदा आणताना पणनमंत्री जयकुमार रावल यांच्याशी चर्चा करणार असल्याचे कोकाटे म्हणाले. शेतकऱ्यांच्या फसवणूक करणाऱ्या व्यापाऱ्यावर कारवाई करण्यासाठी कठोर कायदा आगामी मार्च महिन्यात आणला जाईल, अशी माहिती कोकाटे यांनी दिली. नाशिकमध्ये व्यापाऱ्यांकडून फसवणूक झालेल्या शेतकरी आणि पोलीस प्रशासनाच्या बैठकीत कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांनी ही घोषणा केली. नाशिकमधील ही बैठक कृषीमंत्री माणिकराव कोकाटे यांच्या अध्यक्षतेखाली सुरू झाली. बैठकीला विशेष पोलीस महानिरीक्षक दत्तात्रय कराळे, पोलीस अधीक्षक विक्रम देशमाने, सह्याद्री फार्मचे विलास शिंदें उपस्थित होते. द्राक्ष उत्पादक शेतकऱ्यांची काही व्यापाऱ्यांकडून फसवूणक झाल्याची प्रकरणं समोर आली आहेत. याप्रकरणी नाशिकच्या विविध पोलीस ठाण्यात गुन्हे दाखल आहेत. मात्र, पोलीस तपास होत नसल्याने बैठक बोलावण्यात आली होती.

----------------

### नगरपालिका, महापालिकेच्या

विधानसभा निवडणुकानंतर आता स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका कधी होणार याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. नेत्यांच्या निवडणुका झाल्या, आता कार्यकर्त्यांच्या निवडणुका कधी होतील, असा प्रश्न सातत्याने उपस्थित होत आहे. कारण, ओबीसी आरक्षणाच्या मुद्द्यावरुन स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लांबणीवर पडल्या असून गेल्या २ ते अडीच वर्षांपासून नगपालिका व महापालिकांच्या निवडणुकाच घेण्यात आल्या नाहीत. विशेष म्हणजे सध्या या संस्थांचा कारभार प्रशासनाकडून पाहिला जात आहे. यासंदर्भाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पत्रकाराच्या प्रश्नावर उत्तर देताना कालावधी सांगितला आहे. यावेळी, राज्यातील स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांवरही त्यांनी भाष्य केले. मला असे वाटते की, जानेवारीमध्ये सर्वोच्च न्यायालयाने स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीसंदर्भाने अंतिम सुनावणी ठेवलेली आहे. आम्ही देखील याबाबत सातत्याने विनंती केली आहे, मला अशी अपेक्षा आहे की, जानेवारी महिन्यातच सर्वोच्च न्यायालय याप्रकरणी अंतिम सुनावणी घेऊन निकाल देईल. त्यानंतर, जो काही वेळ असेल तो घेऊन निवडणुकांच्या तारखा जाहीर होतील, अर्थात निवडणुकांच्या तारखा ठरवायचा अधिकार हा आमचा नसून सर्वोच्च न्यायालयाचा आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीसांनी स्पष्ट केले. आम्ही देखील सरकार म्हणून या प्रकरणी जास्तीत जास्त प्रयत्नशील असून लवकरात लवकर निवडणुका व्हाव्यात हे पाहत आहोत, असेही फडणवीसांनी सांगितले.

-------------

### हत्येचा खरा तपास करायचा आहे,

मुंडे यांनी म्हटले आहे. ही हत्या व्यवहारातून झाली यात तथ्य असले तरी संतोष देशमुख यांच्या हत्येत व्यवहार नव्हता असे राष्ट्रवादी शरद पवार गटाचे खासदार बजरंग सोनावणे यांनी पत्रकार परिषदेत म्हटले आहे. या प्रकरणात जर खरा तपास करायचा असेल तर ज्या दिवशी ६ तारखेला कोणाचा फोन आला. ही पोलीस स्टेशनच्या पीएसआयची सीडीआर काढा, ९ तारखेला संतोष देशमुख यांची हत्या झाल्यानंतर सरपंचाच्या भावाला कोणा-कोणाचे फोन आले, पोलीस स्टेशनला कोण-कोण बोलले?, तेथे बनसोड नावाचे पीआय आहेत त्यांना कोणाचा फोन आला, महाजन साहेबांना कोणाचा फोन आला? पाटील कोणाच्या संपर्कात होते. या तिघांचे पण सीडीआर काढा ? या आरोपींना जामीन झाला. आरोपींसोबत पोलीस दिसत आहेत याचे व्हिडीओ व्हायरल झाले आहेत. सर्व चॅनलवर दिसत आहेत. सरपंचाच्या भावाशी हॉटेलमध्ये कोणी संवाद साधला हे सर्व व्हिडीओ व्हायरल झाले आहेत, सर्वांचे सीडीआर तपासा अशीही मागणी खासदार बजरंग सोनावणे यांनी केली आहे.

-------------------

### रामटेक बंगला पंकजा

रामटेक बंगल्याबाबत बरेच समज-गैरसमज असून विलासराव देशमुख, एकनाथ खडसे, छगन भुजबळ, दिपक केसरकर यांना हा बंगला मिळाला होता. त्यानंतर त्यांच्या नशीबी राजकीय वनवास आला. त्यामुळे हा बंगला घेण्यासाठी कोणताच मंत्री तयार होत नाही. सध्या हा बंगला महसुल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना मिळाला असून त्यांनी तो घेण्यास नकार दिला आहे. तसेच त्यांनी मुख्यमंत्र्यांना तसे कळवून दुसरा बंगला देण्याची विनंती केली आहे. तर दुसरीकडे याच बंगल्यात १९९५ साली युती सरकारमध्ये उपमुख्यमंत्री असताना स्व. गोपीनाथ मुंडे यांचे वास्तव्य होते. त्यामुळे आपले रामटेक बंगल्याशी भावनिक नाते असल्याचे मंत्री पंकजा मुंडे यांनी सांगून हा बंगला घेण्याची तयारी दर्शवली आहे. त्यामुळे त्यांना तो दिला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

------------

### आ.धसांनी राजकीय पोळी भाजण्यासाठी

त्यांना भेटायला जाणार, किती रुपयात सेंटलमेंट झाली अशी चुकीची माहिती माध्यमांना देत आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रकार केला असल्याचे मत परळीतील अपहरण प्रकारणातील पीडित व्यापारी अमोल डुबे यांनी व्यक्त केला आहे. आमचे दोन पिढ्यांपासून मुंडे कुटुंबियांशी जिव्हाळ्याचे संबंध आहेत. नेहमी एकमेकांच्या सुख-दुःखात आम्ही सहभागी असतो. त्यामुळे आमच्या कुटुंबावर संकट येताच मुंडे कुटुंबाने आमची मदत केली. पोलिसांनी माझी तातडीने सुटका तर केलीच शिवाय अवघ्या पाच दिवसात गुन्ह्यातील आरोपींना मुद्दे-मालासह अटक केले, याबद्दल आम्ही पोलिसांचे जाहीर आभार देखील व्यक्त केले आहेत. मात्र या घटनेच्या आडून आ.सुरेश धस हे आपली राजकीय पोळी भाजण्याचा प्रयत्न करत असून, त्यांनी आम्ही त्यांना भेटणार वगैरे अशा स्वरूपाची अत्यंत चुकीची व धादांत खोटी माहिती माध्यमांना दिली असून, आपली राजकीय पोळी भाजण्यासाठी त्यांनी डुबे व मुंडे कुटुंबाच्या अनेक वर्षांच्या संबंधात वितुष्ट आणू नये, असे आवाहनही अमोल डुबे यांनी केले असून, आ.सुरेश धस यांच्या माध्यमांवरील पेरल्या जात असलेल्या विविध बतावणींच्या अनुषंगाने ही एक चपराक असल्याचे मानले जात आहे.

------------

### बीड आहे की गँग ऑफ

बाजू राज्याच्या समोर आली. गुन्हेजगताशी संबंधीत अनेक गोष्टींचा उलगडा होताना दिसत आहे. जिल्ह्यात जानेवारी ते ऑक्टोबर २०२४ या कालावधीत ३६ खून झाल्याची नोंद आहे. यात परळीतील सरपंचाच्या खुनाचाही समावेश आहे. यात राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या नेत्याचाही समावेश होता. याचा तपास स्थानिक गुन्हे शाखेकडे देण्यात आला. याला अनेक महिन्यांचा कालावधी उलटला तरी हा नेता अद्यापही एलसीबी आणि स्थानिक पोलिसांना सापडलेला नाही. तसेच खून करण्याचा प्रयत्न केल्याच्याही १६८ घटनाही घडलेल्या आहेत. गर्दी करून मारामारी करणे, दंगल घडवणे यासारखे ४९८ गुन्हे १० महिन्यांत दाखल आहेत. यातील ७ गुन्हे अजूनही उघड झालेले नाहीत..याशिवाय १५६ अत्याचाराच्या ३८६ विनयभंग झाल्याच्या घटना देखील या कालावधीत समोर आल्या आहेत. बीड जिल्ह्यात महिला, मुली देखील सुरक्षित नाहीत. १० महिन्यांत अत्याचाराच्या १५६ तर विनयभंग, छेडछाडीच्या ३८६ घटना घडल्या आहेत.

------------

### भविष्य निर्वाह निधी संघटनेच्या

कालावधी लागतो, तो घटवण्यासाठी पाऊलं टाकण्यात येत आहे.

ईपीएफ योजनेतंर्गत महिन्याच्या २४ तारखेपर्यंत क्लेम सेटलमेंटसाठी येणाऱ्या अर्जावर केवळ मागील महिन्याचे व्याज देण्याची तरतूद होती. पण आता नवीन नियमानुसार, ईपीएफ सदस्यांना प्रोव्हिडंट फंडवर देण्यात येणाऱ्या व्याज नियमात बदल करण्यात आला आहे. आता क्लेम सेटलमेंटच्या तारखेपर्यंत व्याज देण्यात येणार आहे. त्यासाठी सेंट्रल बोर्ड ऑफ ट्रस्टीजने ईपीएफओला परवानगी दिली आहे. ईपीएफ योजना १९५२ मधील ६०(२)(बी) नियमात त्यासाठी सुधारणा करण्यात आली आहे. केंद्र सरकारने या बदलाचे गॅझेटमध्ये प्रकाशन केल्यानंतर नवीन नियम लागू होईल. हा नियम सेवा निवृत्तीवेळी संपूर्ण रक्कम काढण्याची परवानगी देतो. तर ५५ वर्षावेळी सेवेतून निवृत्ती, अपंगत्व आल्यास पीएफ खाते बंद करावे लागल्यास हा नवीन नियम लागू होईल. तर सलग दोन महिने बेरोजगार असल्यास नवीन नियमानुसार पीएफ खात्यातून रक्कम काढण्यावर नवीन नियमानुसार व्याज मिळेल.

cmyk

राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....


गुरुवार, दि.२६ डिसेंबर २०२४



## रुद्र पाखरे यांची राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेकरिता निवड

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र शासन क्रीडा व युवक सेवा संचालनालय पुणे द्वारा राज्यस्तरीय सायकलिंग रोडरेस क्रीडा स्पर्धा २०२४-२५ चे आयोजन गोंदिया जिल्हातील देवरी येथे दिनांक २३ ते २५ डिसेंबर दरम्यान करण्यात आले होते. या स्पर्धेत बीड जिल्हातील गोमळवाडा तालुका शिरूर कासार येथील मुळ रहिवासी रुद्र आशा कल्याण पाखरे यानी युनिव्हर्सल इंग्लिश मेडियम हायस्कूल उमरखेड जिल्हा यवतमाळ विभाग अमरावती मार्फत सहभाग घेऊन अंजिक्य पद प्राप्त केले. म्हणून त्याची बिहार राज्यातील पटणा येथे होणाऱ्या राष्ट्रीय सायकलिंग स्पर्धेकरिता महाराष्ट्र च्या राज्य संघात निवड झाली असून राष्ट्रीय खेळाडू होण्याचा मान प्राप्त झाला आहे. म्हणून त्याचे आजोबा गंगाधर पाखरे, भगवान तांदळे, काका श्रीकांत पाखरे ,मामा संभाजी खाडे, यशवंत तांदळे, वसंत तांदळे, विनोद आघाव ,संदिप आघाव इतर नातेवाईकांने कौतुक करुन पुढील स्पर्धेसाठी साठी शुभेच्छा दिल्या आहेत.



# साक्षरतेतून समृध्दीकडे जाण्यासाठीच हा उल्लास नवोपक्रम - गटशिक्षणाधिकारी उजगरे

वडवणी । प्रतिनिधी

आपला संपूर्ण भारत देश हा पूर्णपणे शंभर टक्के साक्षर झाला पाहिजे हा उद्देश ठेवूनच देशात केंद्र सरकारच्या वतीने व महाराष्ट्रात महाराष्ट्र शासनाच्या वतीने उल्लास नवभारत साक्षरता अभियान हा उपक्रम आपण मागील दोन वर्षांपासून आपल्या भागात राबवत आहोत. या उपक्रमातून आपण अनेक असक्षरांना साक्षर करुन त्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात सामावून घेतलेले आहे. हे काम असेच आपणांस यापुढेही सुरुच ठेवायचे आहे. अक्षरांना साक्षर करताना केवळ पुस्तकी ज्ञान नव्हे तर त्यांना सर्वंकष बाबीचे सर्वांगिण ज्ञान अवगत असणे गरजेचे आहे. आणि त्या दृष्टीनेच आपण सर्वजण काम करत आहोत. ऑनलाईन आर्थिक व्यवहार असेल, डिजीटल साक्षरता असेल, मतदार जनजागृती असेल, पायाभूत साक्षरता असेल, आहार आणि स्वच्छता असेल, अक्षर ओळख असेल, संख्याज्ञान असेल, अंकगणित असेल किंवा दैनंदिन व्यवहार असेल या सर्व गोष्टींची जाणिव त्यांच्यामध्ये निर्माण होत आहे. हे प्रगतीचे लक्षण असून साक्षरतेतून समृध्दीकडे जाण्यासाठीच हा उल्लास नवोपक्रम असल्याचे प्रतिपादन वडवणी तालुक्याचे गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांनी वडवणीतील तालुकास्तरीय उल्लास मेळाव्याप्रसंगी व्यक्त केले.

आपला संपूर्ण भारत देश हा पूर्णपणे शंभर टक्के साक्षर झाला पाहिजे हा उद्देश ठेवूनच देशात केंद्र सरकारच्या वतीने व महाराष्ट्रात महाराष्ट्र शासनाच्या वतीने हे उल्लास नवभारत साक्षरता अभियान हा उपक्रम राबविण्यात येत आहे. जिल्हास्तरावरील मेळावा संपन्न झाल्यानंतर प्रत्येक तालुका स्तरावर आता या मेळाव्याचे आयोजन करण्यात येत आहे. या अनुषंगाने वडवणी येथील गटसाधन केंद्राच्या प्रांगणामध्ये काल दिनांक २४ डिसेंबर २०२४ मंगळवार रोजी वडवणी तालुकास्तरीय उल्लास मेळाव्याचे आयोजन सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेमध्ये करण्यात आले होते. वडवणी तालुक्याचे कर्तव्यदक्ष तथा कार्यतत्पर गटशिक्षणाधिकारी बाबासाहेब उजगरे यांच्या शुभहस्ते फीत कापून या मेळाव्याचे उदघाटन करण्यात आले. याप्रसंगी सर्वप्रथम क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करुन अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी व्यासपीठावर वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर, कन्या वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर, पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश धायतिडक सर, चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर, चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख पवनराजे देशमुख सर, काडीवडगांव केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर, देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख निलेश चव्हाण सर, तांबोळी सर, घुमरे सर यासह वडवणी गटसाधन केंद्रातील सर्व कर्मचारी वृंद इतर काही शिक्षक वृंद व विद्यार्थी आणि नव साक्षर हे उपस्थित होते. याप्रसंगी वडवणी तालुक्यातील एकूण सर्वच्या सर्व सात केंद्रांनी प्रदर्शनासाठी वेगवेगळ्या विषयांच्या अनुषंगाने यावेळी आपले साहित्यांचे स्टॉल लावले होते. यामध्ये वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सुरेश करांडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली शैक्षणिक साहित्य या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात आळणे सर, डोरले सर, आनेराव सर, घुगे सर, सोळंके महाराज सर, राख मॅडम, थिटे मॅडम, बडदे मॅडम, केकान मॅडम यांचा सहभाग होता. कन्या वडवणी केंद्राचे केंद्रप्रमुख सैलानी शेख सर यांच्या मार्गदर्शनाखाली अक्षर ओळख या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात ठोंबरे मॅडम, सोनटक्के मॅडम, शेख मॅडम, चव्हाण सर, आवंतकर सर यांचा सहभाग होता. चिंचवण केंद्राचे केंद्रप्रमुख सुनिल मुंडे सर यांच्या मार्गदर्शनाखाली पौष्टिक आहार आणि स्वच्छता या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात मस्के मॅडम, तांबडे मॅडम, जगताप मॅडम, गायकवाड सर, वाव्हळ सर, मुंडे सर यांचा सहभाग होता. देवळा केंद्राचे केंद्रप्रमुख निलेश चव्हाण सर यांच्या मार्गदर्शनाखाली मतदार जनजागृती व पायाभूत साक्षरता व संख्याज्ञान या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात सावंत सर, राठोड सर, मोरे सर, कळसकर सर, लंगडे सर यांचा सहभाग होता. काडीवडगांव केंद्राचे केंद्रप्रमुख प्रकाश गांडगे सर यांच्या मार्गदर्शनाखाली डिजीटल साक्षरता या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात लांडगे सर, खटावकर सर, बीडकर सर, पवार सर, म्हेत्रे सर, लोकरे सर, भड सर यांचा सहभाग होता. पिंपरखेड केंद्राचे केंद्रप्रमुख गणेश धायतिडक सर यांच्या मार्गदर्शनाखाली अंकगणित या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात खटावकर सर, कोकणे सर, टकले सर, साळुंखे सर, आमेर सर, देवकते सर, वाघमारे मॅडम यांचा सहभाग होता. चिंचाळा केंद्राचे केंद्रप्रमुख पवनराजे देशमुख सर यांच्या मार्गदर्शनाखाली ऑनलाईन आर्थिक व्यवहार या विषयाच्या अनुषंगाने स्टॉल लावण्यात आला होता. यात गायकवाड मॅडम, बरडे सर, यादव सर, कदम सर, घोडके सर, काळे सर यांचा सहभाग होता. अशाप्रकारे सर्व विषयांच्या स्टॉलला उपस्थित सर्वांनी भेट देवून पाहणी केली व साहित्यांचा प्रत्यक्ष अनूभव देखील घेतला. तसेच याप्रसंगी गायकवाड मॅडम यांनी छान अशी कविता सादर केली. लांडगे सर यांनीही छान असे गीत गायन केले. घोडके सर व त्यांचा सर्व संघ यांनी छान असे भारुड सादर केले. डोरले सर यांनी छान अशी कविता सादर केली. चिंचाळा केंद्र टीम यांच्या वतीने छान अशी नाटिका सादर करण्यात आली. साक्षरतेचे महत्व या विषयावर जिल्हा परिषद प्राथमिक शाळा बाहेगव्हाण येथील चिमुकल्या विद्यार्थ्यांच्या संघाने छान अशी नाटिका सादर केली. तर शेवटी वडवणी तालुका संघाच्या वतीने बीड येथील जिल्हास्तरावर संपन्न झालेल्या व जिल्हा मेळाव्यामध्ये वाहवा मिळवलेल्या साक्षरतेतून समृध्दीकडे या विषयावरील अप्रतिम अशी नाटिका सादर करुन येथील उपस्थितांचीही मने जिंकली. या सर्व कार्यक्रमाचे सूत्रसंचालन गणेश धाईतिडक सर यांनी केले तर शेवटी सर्व उपस्थितांचे आभार सैलानी शेख सर यांनी मानले. अशाप्रकारे अतिशय हर्षोल्लासात व जल्लोषात हा वडवणी येथील तालुकास्तरीय उल्लास मेळावा संपन्न झाला.



## माती व पाणी हा दृष्टीकोण अंगीकारला तरच गावे समृद्ध होतील -डॉ.राजेंद्रसिंह राणा

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्राला खर्या अर्थाने समृद्धकडे न्यायचे असेल तर माती व पाणी यांचा विकास झाला तरच शेतकर्यांचे जीवन खर्या अर्थाने समृद्ध होईल व या माध्यमातून राष्ट्र प्रगती पथाकडे जाईल. असे प्रतिपादन राजस्थान येथील राष्ट्रीय जलपुरूष राजेंद्रसिंह राणा यांनी केले.

मंगळवारी साने गुरूजी यांच्या जयंती निमित्त आणि डॉ.द्वारकादास लोहिया (बाबुजी) यांच्या स्मरणार्थ मराठवाडा नवनिर्माण लोकायत (मानवलोक) व मानवलोक समाज महाविद्यालय यांच्या वतीने मंगळवारी डॉ.द्वारकादास लोहिया लोकसहभाग पुरूस्कार वितरण व राष्ट्रीय जलपरिषदेचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी म्हणून डॉ.राजेंद्रसिंह राणा बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी

राज्य ग्रामिण विकास संस्था यशदा पुणेचे संचालक डॉ.मलिनाथ कलशेट्टी होते. तर व्यासपीठावर सत्कार मुर्ती कृषी भूषण तथा जलतज्ञ विजयअण्णा बोराडे जल बिरादरीचे अध्यक्ष नरेंद्र चुग, यशदाचे सुमंत पांडे, गटविकास अधिकारी समृद्धी दिवाणे, मानवलोकचे अध्यक्ष अशोकराव देशमुख, कार्यवाह अनिकेत लोहिया यांची उपस्थिती होती.



डॉ.द्वारकादास लोहिया, लोकसहभाग पुरस्काराचे वितरण

यावेळी बोलताना राजेंद्र सिंह राणा म्हणाले की, लोकांच्या सहभागातून त्यांचे प्रश्न कसे सोडवता येतील., शेतकर्यांच्या पंखात बळ निर्माण करण्याचे काम डॉ.द्वारकादास लोहिया यांनी केली. पाणी हा मानवाच्या विकासाचा केंद्र बिंदु आहे. ही संकल्पना डॉ.लोहिया यांनी ४२ वर्षापुर्वी सुरू केली. त्यांनी सुरू केलेल्या जलचळवळीचा परिणाम आज कृषि क्रांतीच्या माध्यमातून दिसून येतो. यावेळी त्यांनी बदलते पर्यावरण पासाचा लहरीपणा व पाण्याची बचत या विषयावर सविस्तर मार्गदर्शन केले. यावेळी आपल्या सत्काराला उत्तर देताना विजयअण्णा बोराडे म्हणाले की, मातीचे संवर्धन झाले तर पाण्याचा प्रश्न आपोआप दुर होईल. यासाठी माती समृद्ध झाली पाहिजे. आज मातीची समृद्धी न राहिल्याने शेतीचा कस बदलला आहे. जमिन व शेती जीवित ठेवा मृत जमिनीवर शेती करण्यापेक्षा सेंद्रिय शेती वाढवा असा सल्ला त्यांनी दिला. यावेळी त्यांनी परित्याक्त्यांचे प्रश्न सामाजिक संस्थांनी एकत्रित येवून सरकारला नवा विचार दिला पाहिजे. अशी अपेक्षा व्यक्त केली.

आपल्या अध्यक्षीय समारोपात बोलताना डॉ.मलिनाथ कलशेट्टी म्हणाले की, ग्रामपंचायतीच्या माध्यमातून गावाच्या विकासाची मोठी संधी उपलब्ध झाली आहे. गावच्या विकासाचा आराखडा तयार करताना गाव जलसमृद्ध कसे होईल. याला प्राधान्य दिले पाहिजे. वित्त आयोगाकडून मिळणार्या निधीत ठिबक सिंचन, सांडपाण्याचे व्यवस्थापन, पुर्नवापर व सिंचन या बाबींना प्राधान्य द्या. गावचे वॉटर बजेट ही संकल्पना गावातच समृद्ध झाली पाहिजे असे आवाहन त्यांनी केले. यावेळी कृषि भूषण तथा जलतज्ञ विजय आण्णा बोराडे यांना

डॉ.द्वारकादास लोहिया (बाबुजी) लोकसहभाग पुरस्काराने मान्यवरांच्या उपस्थितीत सन्मान करण्यात आले. शाल, श्रीफळ, स्मृती चिन्ह, सन्मानपत्र व रोख रक्कम ५१ हजार रूपये देवून त्यांचा गौरव करण्यात आला. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिकेत लोहिया यांनी केले. संचलन प्रा.रमा.पांडे व प्रा.सुकेशनी रामटेके यांनी केले. तर उपस्थितांचे आभार हनुमंत साळुंके यांनी मानले.

## अटल बिहारी वाजपेयी यांचे कार्य व विचार सर्वांसाठी सदैव प्रेरणादायी राहतील -राऊत

माजलगाव । प्रतिनिधी

येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने नगरसेवक विनायक रत्नपारखी यांच्या निवासस्थानी सुशासन दिवस व भारतरत्न माजी पंतप्रधान स्वर्गीय अटल बिहारी वाजपेयी यांची १०० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.या प्रसंगी अरुण राऊत यांनी अटल बिहारी वाजपेयी यांच्या आठवणीला उजाळा देत काही आठवणी सांगितल्या.अटल बिहारी वाजपेयी हे आजात शत्रू व्यक्तिमत्व होते. त्यामुळे विरोधी पक्षांमध्ये देखील त्यांचा सन्मान केला जात होता. राष्ट्रभक्तीने प्रेरित होऊन शेवटपर्यंत त्यांनी आपले आयुष्य देशासाठी समर्पित केले.त्यामुळे अटलजी हे प्रत्येक भारतीयांच्या मनामध्ये कायम राहतील.अटल बिहारी वाजपेयी यांनी केलेले कार्य व सामाजिक समरसता हे त्यांनी दिलेले विचार या शिकवणीवर आम्ही चालण्याचा प्रयत्न करू व त्यांच्या स्वप्नातील मजबूत भारत घडवण्यासाठी आपण सर्वांनी कटीबद्ध राहू असे सांगितले.या जयंतीच्या निमित्त उपस्थित भाजपाचे नेते तथा माजी नगराध्यक्ष डॉक्टर अशोक तिडके, नगरसेवक विनायक रत्नपारखी,सरपंच नारायण भले, भागवत गोरे , प्रल्हादराव दळवी, बाळासाहेब साळवे,रवी गायकवाड सह भाजपाचे पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.



## मोर्चामध्ये मोठ्या संख्येने सहभागी व्हा-पांडुरंग जाधव

माजलगांव । प्रतिनिधी

मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणातील सर्व आरोपीना तातडीने अटक करावी आणि कुटुंवाला न्याय द्यावा या मागणीसाठी येत्या शनिवारी २८ डिसेंबर रोजी वीडमध्ये सर्वपक्षीय मोर्चाचे आयोजन करण्यात आले आहे.

स्व. संतोष देशमुख यांची निघृण हत्या करणाऱ्या क्रूरकर्त्यांना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी वीडमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मोर्चा निघणार आहे.स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी आज सर्वपक्षीय, सर्व समाज आणि संघटनांनी एकत्र येवून वीड शहरात व्यापक बैठक घेऊन शनिवार दिनांक २८ डिसेंबर रोजी सरपंच संतोष देशमुख हत्या प्रकरणी सर्व आरोपीना तातडीने अटक करावी आणि कुटुंवाला न्याय द्यावा या मागणीसाठी मोर्चाचे आयोजन केले आहे. वीड जिल्ह्यातील आपल्या वांधवाला न्याय देण्यासाठी स्व. संतोष देशमुख यांच्या निघृण हत्येतील गुन्हेगारांना फाशीची शिक्षा व्हावी यासाठी सर्वांनी एकत्र येवून प्रयत्न करायला हवेत असे मत प्रत्येक वीडकर नागरिकांचे झाले आहे. यावेळी उपस्थित यांनी एकमताने दिनांक २८ डिसेंबर २०२४ रोजी वीड मध्ये आयोजीत मोर्चामध्ये सहभागी व्हावे असे आवाहन पांडुरंग जाधव यांनी केले आहे. भारतीय संविधानाचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. वावासाहेव आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून या भव्य मोर्चाला सुरुवात होणार आहे.



पान ६ वरून...

### बेशिस्त ऊस वाहतूक

गमावले आहेत. रस्त्यावर वाहतुकीच्या नियमांचे उल्लंघन करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी उपविभागीय पोलिस अधिकारी, ग्रामीण व शहर पोलिस स्टेशन माजलगाव यांच्याकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.यावेळी शेतकरी कामगार पक्षाचे नेते ॲड नारायण गोले पाटील,जीवन राठोड,संभाजी ब्रिगेडचे तुकाराम नावडकर,परमेश्वर अडागळे,लक्ष्मण काशीद,विलास कोळपे,पुरूषोत्तम जाधव,पद्माकर शिंदे,राजेभाऊ आवाड,परमेश्वर डाके यांची उपस्थीती होती.

### संतोष देशमुख निर्घृण

जिल्ह्यामध्ये दहशत पसरवणारे कोण आहेत ?

आणि या क्रूर हत्या करणाऱ्या गुन्हेगारांचे पाठीराखे,सूत्रधार आणि त्यांना आश्रय देणारे त्यांचे ‘‘आका ‘‘ कोण आहेत ? याचा शोध पोलीस विभागाने घ्यावा अशी मागणी केली होती. त्या पार्श्वभूमीवर बीड येथील सर्व पक्षीय मोर्चामध्ये आ.सुरेश धस यांचा सहभाग हा अत्यंत महत्त्वाचा असून या मोर्चामध्ये ते आणखी काय गौप्यस्फोट करणार आहेत? या विषयी बीड जिल्ह्यातील जनतेमध्ये उत्सुकता आहे.

### पाटोदा तहसिलच्या नाकावर

नाही तर एक छदामही रॉयल्टी भरलेली नाही. खुप मोठया प्रकारचे आवाज खरीप फोडण्यासाठी बाल्स्ट करुन ३५ ते ४० फुट खोली केली आहे.सदरील ठिकाणी रहिवासी घराचे बांधकाम असुन त्या बांधकामांना तडे जातात . व ग्रामपंचायत कार्यालयाची कसलीही नाहरकत प्रमाणपत्र न घेता ही कामे चालु आहेत . विचारणा केली असता आम्हाला काम करण्यासाठी तहसील कार्यालयाची परवानगी आहे असे सांगण्यात आले आहे . याप्रकरणी पाटोदा तहसीलदार साहेबांनी घटनास्थळी पाहणी करुन आमची घरे वाचवण्याचा प्रयत्न करावा .या ठिकाणी मोठया प्रकारचे बार घेऊन येथे निघालेले खरीप खडी मशीन साठी विक्री केले जात आहे.या ठिकाणी / परिसरात गंभीर स्वरुपाचा आवाज घेऊन भिंतीला तडे जातायेत व पावसाळयात तेथे पाणी साठा होऊन सदरील वस्ती वरील मानवी जिवास धोका आहे . तो धोका टाळण्यासाठी मा तहसीलदार साहेबांनी त्वरीत कामाची पाहणी करुन योग्य ती कार्यवाही करावी व आमचे घर वाचवावीत हि विनंती . असा सदरील अर्ज हा दि . १६/१२/२०२४ रोजी दिलेला असतांना तहसील कार्यालयाकडुन यांची कसल्याही प्रकारची दखल घेतलेली नाही . पाटोदा तालुक्यात असे गौण खनिज माफियांचा हैदोस चालु असताना पाटोदा महसुली कर्मचाऱ्यांची चंगळ होत आहे.मात्र तहसीलदार यांकडे गांभीर्याने घ्यायला तयार नाहीत.

### वडवणीच्या पाटील गल्लीतील

रोजीपासून दैनंदिन दुपारी १ ते ४ या वेळेत करण्यात आले आहे. महाराष्ट्रातील नामांकित शिव महापुराण कथा प्रवक्ते ह.भ.प.प्रकाश महाराज साठे हे या शिव महापुराण कथेचे प्रवक्ते असून त्यांच्या कर्णमधुर वाणीतून या शिव महापुराण कथेची भव्यता अगदी सुक्ष्मपणे भाविकांच्या मनावर बिंबणार आहे. याप्रसंगी पकवाज वादक ह.भ.प.रामेश्वर महाराज थोटे, सिंथ वादक ह.भ.प.रघुनाथ महाराज थोरात, सहगायक ह.भ.प.अंकुश महाराज दराडे, तर तबला वादक ह.भ.प.अक्षय महाराज पांचाळ हे उपस्थित असणार आहेत. दरम्यान शिव महापुराण भगवान शंकर आणि त्यांच्या अवताराशी निगडीत आहे. त्यात शिव भक्ती, शिव महिमा आणि शिवाचे संपूर्ण जीवन चरित्र वर्णिले आहे. त्याच बरोबर ज्ञान, मोक्ष, उपास, तप, जप यांचा मिळणाऱ्या फळांचे देखील वर्णन आढळतं. शिव महापुराणामध्ये सहस्त्र ज्ञानवर्धक आणि भक्ती विषयक लिहिले आहे. यात प्रामुख्याने धन संग्रह, रागाचा त्याग, अन्नाचा त्याग, संध्याकाळ, खरं बोलणे, निष्काम कर्म, अनावश्यक इच्छांचा त्याग करणं, मोहाचा त्याग करणं, सकारात्मक कल्पनाशक्ती, प्राणी नव्हे तर माणूस बना यांविषयी सविस्तर असे वर्णन केलेले आहे. तरी वडवणीकरांसाठी हा शिव महापुराण कथा सोहळा म्हणजे मोठी अध्यात्मिक पर्वणी ठरणार असून या कथेची सांगता दि.२७ डिसेंबर २०२४ शुक्रवार रोजी होणार आहे. या सांगता दिनी सकाळी ९ ते ११ वाजेपर्यंत कथा सांगता होईल व त्यानंतर सकाळी ११ ते १२ वाजेपर्यंत सुप्रसिध्द किर्तनकार ह.भ.प.दिपक महाराज मेटे यांचे काल्याचे किर्तन होईल व त्यानंतर भव्य महाप्रसादाचा कार्यक्रम संपन्न होईल. तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला, माता भगिनींसह सर्व शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिव महापुराण कथेच्या दैनंदिन श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक समस्त महिला मंडळ पाटील गल्ली वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.

### ओवी बडे यांच्या वाढदिवसानिमित्त

कन्या ओवी हिच्या वाढदिवसानिमित्त या शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना दप्तर आणि इंग्लिश स्पोकन हे पुस्तक भेट म्हणून दिले. दरवर्षी विश्वजीत बडे हे वाढदिवसा निमित्त काही ना काही सामाजिक उपक्रम राबवत असतात. यावर्षी त्यांनी मुलीच्या वाढदिवसानिमित्त दप्तर आणि तेही दर्जेदार देण्याचा उपक्रम राबवला. या उपक्रमाबद्दल शाळेच्या शिक्षकांनी त्यांचे आभार मानले. आपण समाजाचे काही देणे लागतो. या भावनेतून त्यांनी हा उपक्रम राबवला असून दरवर्षी विद्यार्थ्यांसाठी वह्या, पुस्तके, दप्तर, गणवेश वाटप अशा प्रकारचा उपक्रम राबवण्याचा मानस त्यांनी व्यक्त केला.

# कोपरा येथे राष्ट्रीय किसान दिन उत्साहात साजरा

## सेंद्रिय कर्ब वाढीसाठी ऊसाचे पाचट शेतातच कुजवा : शिवप्रसाद येळकर

अंबाजोगाई । प्रतिनिधी

भारताचे पाचवे पंतप्रधान चौधरी चरणसिंग यांचा वाढदिवस २३ डिसेंबर हा राष्ट्रीय किसान दिन म्हणून साजरा केला जातो, यानिमित्ताने प्रगतिशील शेतकऱ्यांचा सन्मान करण्याचे हेतूने नॅचरल शुगर अँड अलाईड इंडस्ट्रीज लिमिटेड रांजणीचे चेअरमन बी बी ठोंबरे यांच्या मार्गदर्शनाखाली नॅचरल शुगर, परादीप फॉस्फेटस ली. (जय किसान) व कृषी विभाग महाराष्ट्र शासन यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील कोपरा येथे शेतकरी मेळाव्याचे आयोजन करून मार्गदर्शन करण्यात आले. कार्यक्रमामध्ये अंकुश देशमुख, इंद्रजीत देशमुख या प्रगतिशील शेतकऱ्यांचा सत्कार करण्यात आला. पीपीएल कंपनीचे जिल्हा व्यवस्थापक चेतन भोसले यांनी केळी पिकाचे अन्नद्रव्य व्यवस्थापन बाबत मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक तथा ऊस विकास अधिकारी शिवप्रसाद रामप्रसाद येळकर यांनी आरोग्य पत्रिकेवर आधारित खत व्यवस्थापनाची माहिती देऊन मृदा आरोग्यामध्ये सेंद्रिय खतांचे महत्व, फर्मेंटेड ऑरगॅनिक मॅन्युअर सोबत रासायनिक खतांची भट्टी लावून खतांची कार्यक्षमता वाढवण्याची पद्धती, पिकाच्या अवशेषांमध्ये सुप्त अवस्थेमधील किडींचे व घातक बुरशींच्या व्यवस्थापनासाठी बायोमिक्सचा वापर, हरभरा, ज्वारी पिकांमधील अळीवर्गीय किडींचे व्यवस्थापन करण्यासाठीच्या उपाययोजना, पूर्व हंगामी ऊस एकात्मिक कीड रोग अन्नद्रव्य व्यवस्थापन करिताचे नियोजन, बेणे प्रक्रिया तसेच खोडवा ऊसाचे व्यवस्थापन व पाचट कुजवण्याबाबत माहिती दिली. नॅचरल शुगरच्या माध्यमातून माफक दरामध्ये नॅचरल ऑरगॅनिक फर्टीलायझर या भू-सुधारकाचा वापर करण्यासंदर्भात विस्तृत माहिती येळकर यांनी दिली. कृषी सहाय्यक पंडित काकडे यांनी फवारणी करताना घ्यावयाची काळजी बाबत मार्गदर्शन केले. जय किसानचे शेती सल्लागार अमजद पठाण यांनी भू-सुधारकांचा वापर करण्यासंदर्भात माहिती दिली. बेस्ट ॲग्रोचे प्रतिनिधी सुंदर उबाळे यांनी ऊस पिकामधील तणनाशक बाबत माहिती दिली. कार्यक्रमाला मोठ्या संख्येने शेतकरी उपस्थित होते.



असे करा खोडवा ऊस व पाचट व्यवस्थापन

ट्रॅक्टरचलित पाचट कुट्टी यंत्र उपलब्ध असल्यास त्या यंत्राच्या सहाय्याने पाचटाची कुट्टी करावी. कुट्टी यंत्र उपलब्ध नसल्यास, ऊस तुटून गेल्यावर पाचट सरीमध्ये एकसारखे पसरावे. आंतरमशागत करून मोकाट पाणी द्यायचे असल्यास प्रत्येक सरीआड पाचट जमा करावे, ज्या सरीत पाचट नाही तेथे आंतरमशागत करता येते. पाचटाचे आच्छादन केल्यानंतर किंवा कुट्टी केल्यानंतर ऊसाच्या बुडख्यावर पडलेले पाचट बाजूला करून बुडखे मोकळे करावे. ऊसाचे बुडखे उंच राहिल्यास ते जमिनीलगत कोयत्याने किंवा ट्रॅक्टरचलित बुडखे छाटणी यंत्राने छाटून घ्यावेत. रोग व किडीचा प्रादुर्भाव होऊ नये म्हणून ऊसाच्या बुंध्यावर कार्बेन्डाझिम ५० % डब्ल्यू पी १० ग्रॅम व मॅलेथीऑन ५० % ईसी २५ मिली १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. पाचट कुजवणाऱ्या जिवाणूंची क्रिया जलदगतीने होण्यासाठी स्प्रिंकलरच्या सहाय्याने पाणी द्यावे. पाचटाचे कर्ब:नत्र गुणोत्तर २४:१ च्या जवळ आणण्यासाठी उसाच्या पाचटातील नत्राचे प्रमाण वाढवले पाहिजे, त्यासाठी पाचटावर एकरी ८० किलो युरिया, १०० किलो सिंगल सुपर फॉस्फेट खत पसरवून टाकावे. पाचट कुजण्याची क्रिया जलदगतीने होण्यासाठी जिवाणू संवर्धक वेस्ट डीकंपोजर कल्चर घेऊन २०० लिटर पाण्यात मिसळावे त्यामध्ये दोन किलो गुळ मिसळावा, पाच ते सहा दिवसांनी तयार झालेले २०० लिटर वेस्ट डीकंपोजर द्रावण फवाऱ्याच्या सहाय्याने पाचटावर फवारावे.शिवप्रसाद येळकर, ऊस विकास अधिकारी, नॅचरल शुगर रांजणी.

cmyk

# मृद व जलसंधारण मंत्र्याच्या जिल्ह्यात विभागाच्या कार्यालयाचे साहित्य जप्त करण्याची शेतकऱ्यावर वेळ

यवतमाळच्या पांढरकवडा तालुक्यातील वांजरी प्रकल्पासाठी शेतजमिनी हस्तगत केल्यानंतर २०१७ पासून अडीच कोटींचा वाढीव मोबदला न मिळाल्याने शेतकर्यांनी मृदा व जलसंधारण कार्यालयावर जप्ती आणली. यावेळी कार्यालयातील सुमारे दोन लाखांचे विविध साहित्य जप्त करण्यात आले. दरम्यान खुर्ची आणि टेबल जप्त केल्यानंतर संपूर्ण कार्यालय टेबल खुर्च्या विनाच दिसून येत होते. धक्कादायक बाब म्हणजे राज्याचे मृद व जलसंधारण मंत्र्याच्या गृह जिल्ह्यात विभागाच्या कार्यालयाचेच साहित्य शेतकर्यांना जप्त करण्याची वेळ आली असल्याने सर्वत्र आश्चर्य व्यक्त केलं जात आहे. त्यामुळे मृद व जलसंधारण मंत्री संजय राठोड या प्रकरणी नेमकी काय कारवाई करतात, हे पाहणे महत्वाचे ठरणार आहे.

२५ शेतकऱ्यांच्या शेतजमिनी जिल्ह्यातील पांढरकवडा तालुक्यात असलेल्या वांजरी प्रकल्पासाठी शासनाने २००८ मध्ये हस्तगत केल्या होत्या. यावेळी शेतकऱ्यांना हेक्टरी ३५ हजार रुपये मोबदला देण्यात आला. परंतु सदर मोबदला अल्प असल्याने शेतकऱ्यांनी २०१० मध्ये वाढीव मोबदल्यासाठी भूसंपादन प्राधिकरणाकडे





न्यायालयात याचिका दाखल केली. त्यानंतर २०१३ मध्ये भूधारकांना वाढीव मोबदल्यासाठी आदेश करण्यात आले. काही भूधारक शेतकऱ्यांना मोबदला मिळाला. मात्र मोबदल्यापासून वंचित राहिलेल्या शेतकऱ्यांनी औरंगाबाद येथील भूसंपादन प्राधिकरणाकडे धाव घेतली. त्यामुळे न्यायालयाने जप्तीची कारवाईचे आदेश दिले. यापूर्वी मृदा व जलसंधारण कार्यालयावर दोन वेळा जप्ती आणण्यात आली आहे. त्यानंतर आज पुन्हा जप्ती आणून कार्यालयातील विविध साहित्य जप्त करण्यात आले आहे.

२० लाख रुपयांची लाच मागणाऱ्या वनक्षेत्रपालाला अटक

वसई तालुक्यातील ससुनवघर येथील मालमत्तेवर ताबा मिळवून देण्यासाठी वनक्षेत्रपाल संदीप चौरे आणि खाजगी इसम चंद्रकांत पाटील यांनी तक्रारदाराकडे लाच मागितला होती. तक्रारदाराने पालघर अँटी करप्शन ब्युरोकडे तक्रार केल्यानंतर १९ नोव्हेंबर आणि १३ डिसेंबर रोजी त्याची पडताळणी करण्यात आली. आरोपींनी ठरलेल्या २० लाखांपैकी १० लाखांची रक्कम स्वीकृतीसाठी तयारी दाखवली होती. आणि सापळा रचत एसीबीने खाजगी इसम चंद्रकांत पाटील याला १० लाख घेतांना रंगेहात अटक केली आणि त्यावरुन संदीप चौरे याला ही अटक करण्यात आली आहे.तक्रारीनुसार आरोपींविरोधात भ्रष्टाचार प्रतिबंधक कायद्यांतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास एसीबी तपास करत आहे. यावेळी पालघर अँटी करप्शन ब्युरोने नागरिकांना शासकीय कामासाठी कोणत्याही लाचेची मागणी झाल्यास तत्काळ संपर्क साधण्याचे आवाहन केले आहे.

# केसाळ अळीचे नियंत्रण



अलीकडे विविध पिकांवर केसाळ अळ्यांचा प्रादुर्भाव वाढला आहे. त्या नष्ट करण्यासाठी शेतकर्यांनी एकत्र येऊन सामूहिकरीत्या प्रयत्न करणे आवश्यक आहे. काही महत्त्वाच्या उपाययोजना केल्यास त्यावर निश्चितपणे नियंत्रण मिळवता येते.

केसाळ अळींचा प्रचंड प्रादुर्भाव काही भागात आढळतो. यामागे नष्ट झालेली वनराई हे प्रमुख कारण आहे. जंगलातील खाद्य नष्ट झाल्यामुळे केसाळ अळ्या शेतातील पिकांवर दिसू लागल्या आहेत. केसाळ अळींच्या नियंत्रणासाठी शासनाच्या कृषी विभागाने काही शिफारसी केल्या आहेत. त्या शिफारसी शेतकरी बंधूंनी सामूहिकरित्या राबवल्यास केसाळ अळींचे नियंत्रण शक्य होईल. केसाळ अळींचे कोष जमिनीत सुप्तावस्थेत जातात. म्हणून एप्रिल महिन्यात खोल नांगरट केल्यास अळींचे कोष वर येतील. प्रखर उष्णतेमुळे आणि पक्ष्यांनी वेचून खाल्ल्यामुळे मोठ्या प्रमाणावर कोष नष्ट होऊन अळींची पुढची पिढी नष्ट होईल. पावसाळा सुरू झाला म्हणजे कोषातून पतंग बाहेर पडतात. हे पतंग प्रकाशाकडे आकर्षिले जातात. म्हणून रात्री शेतात बल्ब किंवा कंदिल ठेऊन त्याखाली रॉकेलमिश्रित पाण्याने भरलेले घमेले ठेवल्यास पतंग प्रकाशाकडे आकर्षित होऊन घमेल्यात पडून नष्ट होतील. अंड्यातून बाहेर पडलेल्या अळ्या सामूहिकरित्या शेतातील पीक खाण्याकरिता एका शेतातून दुसऱ्या शेतात येतात. म्हणून आपल्या शेताच्या चहूबाजूने पाणी साचेल असा चर काढावा. या चरात मिथिल पॅराथिऑन भुकटी (लिंडेन) २ टक्के किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के टाकावे. यामुळे लहान अळ्या लवकर मरतील. मादी पतंग गवताच्या पानाखाली अंडी घालत असल्यामुळे शेतीचे बांध व्यवस्थित खुरपून काढावेत.

शेतात मध्यम आकाराच्या अळया दिसतील तेव्हा मिथिल पॅराथिऑन (लिंडेन) २ टक्के किंवा क्विनॉलफॉस १.५ टक्के भुकटी टाकावी. पाच टक्के निंबोळीअर्काची फवारणी करावी. दोन मिली क्विनॉलफॉस किंवा क्लोरापायरीफॉस १० लिटर पाण्यातून फवारणी करावी. मोठ्या झालेल्या अळ्या औषधाला दाद देत नाहीत. म्हणून टोकदार काठीने अळ्या जमिनीवर माराव्यात. वरील सर्व उपाययोजना शेतकरी बंधूंनी एकत्र येऊन राबवल्या तरच या केसाळ अळींचे नियंत्रण शक्य आहे.


# चंदनाच्या लागवडीतून करोडोंची कमाई

जगभरात भारतीय चंदनाला मोठी मागणी आहे, जी पूर्ण करणे शेतकऱ्यांसाठी आव्हानात्मक आहे. चंदनाच्या वाढत्या मागणीमुळे त्याच्या लाकडाची किंमत मोठ्या प्रमाणात वाढते. यामुळेच भारत सरकार आता शेतकऱ्यांना चंदन लागवडीसाठी प्रोत्साहन देत आहे. वेद आणि पुराणातही चंदनाचे चमत्कार सांगितले आहेत. सौंदर्य वाढवण्यासोबतच आयुर्वेदिक औषधातही याचा वापर केला जातो.

जरी चंदनाची लागवड फक्त दक्षिणेकडील भागात केली जात असली तरी आज बर्फाळ प्रदेश वगळता भारतातील जवळपास सर्व राज्यांमध्ये त्याची लागवड केली जात आहे.बाजारात चंदनाची किंमत जितकी जास्त तितकी ती वाढवण्यासाठी जास्त मेहनत घ्यावी लागते. भारतात, चंदनाची लागवड दोन प्रकारे केली जाते, ज्यामध्ये सेंद्रिय पद्धत आणि पारंपारिक पद्धत समाविष्ट आहे.

सेंद्रिय पद्धतीने पिकवलेले चंदन १०-१५ वर्षात लाकडात बदलते. परंतु पारंपारिकपणे चंदनाची लागवड करून २०-२५ वर्षांनीच नफा मिळवता येतो.यामुळेच चंदनाची लागवड शेतकऱ्यांसाठी संयमाची बाब ठरत आहे. आम्ही तुम्हाला सांगतो की एका चंदनाच्या झाडापासून सुमारे १५-२० किलो लाकूड मिळते, जे बाजारात २ लाख रुपयांपर्यंत विकले जाते. बाजारात चंदन ३ ते ७ हजार रुपये किलो दराने विकले जात असले तरी मागणी वाढल्याने ते १० हजार रुपयांपर्यंतही विकले जाते.

जर आपण त्याची रोपवाटिका उभारण्याबद्दल बोललो तर एक रोप १००-१५० रुपये किमतीत उपलब्ध आहे. शेतकऱ्यांची इच्छा असल्यास ते एक हेक्टर जमिनीवर ६०० रोपे लावू शकतात. हीच झाडे झाडे बनू शकतात आणि पुढील १२ वर्षांत ३० कोटी रुपयांपर्यंत निव्वळ नफा देऊ शकतात. एकट्या चंदनाच्या झाडातून सुमारे ६ लाख रुपये कमावले जातात.



काही वर्षांपूर्वीपर्यंत चंदनाच्या लागवडीवर बंदी होती, म्हणजेच शेतकरी सरकारची परवानगी घेऊनच चंदनाची लागवड करत असत. मात्र आता त्याच्या परवानगीने त्याच्या लागवडीसाठी सरकार २८-३० हजार रुपयांपर्यंत अनुदान देत आहे. एवढेच नाही तर सरकारने चंदन खरेदीवरही बंदी घातली आहे. म्हणजे शेतकऱ्यांकडून फक्त सरकारच चंदन खरेदी करू शकते.एकट्या चंदनाचे झाड कधीही लावू नका, कारण ही एक परजीवी प्रजाती आहे जी इतर झाडांपासून पोषण मिळवते. चंदनाची झाडे दमट भागात लावू नयेत, कारण त्याच्या लागवडीला जास्त पाणी लागत नाही. चंदन ही झपाट्याने वाढणारी वनस्पती आहे, त्यामुळे इतर प्रकारची झाडे फक्त ४-५ फूट अंतरावर लावा. चंदनाच्या झाडाला जास्त पाणी दिल्याने ते कुजते, त्यामुळे त्याला पाणी साचू देऊ नका. त्याच्या लागवडीसाठी, किमान २ ते २.५ वर्षे जुने रोप लावा. चंदनाच्या झाडांभोवती स्वच्छता राखा कारण प्रदूषणामुळे त्यांची वाढ थांबते

# संत्रा, मोसंबी बागेचे आंबिय बहार व्यवस्थापन

थंडी संपतेवेळी येणाऱ्या आंबिया बहाराचे व्यवस्थापन करण्यासाठी बागेची खालीलप्रकारे निगा राखावी. शास्त्रीय दृष्टीने निगा राखल्यास संत्रा/मोसंबी बागेपासून आर्थिक उत्पादन मिळवता येते.

संत्रा/मोसंबीचे बहार

निसर्गतः संत्रा/मोसंबी फळझाडास वर्षातून तीनदा बहार येतो. त्यापैकी पावसाळ्यात (जून-जुलै) येणाऱ्या बहारास ''मृग बहार (मृग नक्षत्रात येणारा) आणि पावसाळा संपल्यानंतर (ऑक्टोबरमध्ये) येणाऱ्या बहारास ''हस्त बहार (हस्त नक्षत्रात येणारा) तर थंडी संपतेवेळी (जानेवारी-फेब्रुवारी) म्हणजे आंब्याला ज्या वेळी बहार येतो तो ''आंबिया बहार असे तीन बहार वेगवेगळ्या ऋतूंमध्ये येतात.

संत्रा/मोसंबीचा आंबिया बहार

संत्रा/ मोसंबीची झाडे निसर्गतः थंडीच्या आणि उन्हाळ्याच्या दिवसात कमी-जास्त तापमानामुळे दोनदा विश्रांती घेत असतात. साधारणतः या काळात वातावरण पोषक नसते. झाडांवर नवीन वाढ होत नाही. त्यामुळे या विश्रांतीच्या काळात अतिरिक्त शर्करेचा संचय झाडाच्या ६ ते ९ महिन्यांच्या फांद्यांमध्ये होतो. हवामान अनुकूल झाल्यावर झाडावर फुले येण्यास याचा उपयोग होतो. संत्रा-मोसंबीच्या आंबिया बहाराला नैसर्गिक बहार म्हणतात. या बहारामध्ये संत्रा-मोसंबी झाडाची वाढ कडाक्याच्या थंडीत थांबते. डिसेंबरचा दुसरा आठवडा ते जानेवारीचा दुसरा आठवडा या एका महिन्याच्या कालावधीत रात्रीचे किमान तापमान साधारणतः १० अंश सें. खाली राहते. एवढ्या तापमानावर झाडांना ताण बसतो. या ताणामुळे झाडे खराब होत नाही.आंबिया बहार घेण्याकरिता संत्रा-मोसंबी झाडाला ताण देणे



झाडांची सतत होणारी वाढ थांबविण्याकरिता संत्रा-मोसंबी झाडाला पाण्याचा पुरवठा बंद करणे, म्हणजे झाडांना ताण देणे. संत्रा-मोसंबी झाडाला पाण्याचा ताण दिल्यामुळे झाडांची वाढ थांबते. झाडे विश्रांती घेतात. त्यामुळे झाडाच्या फांद्यांत पानात अन्नद्रव्यांचा संचय होतो. आंबिया बहार घेण्याकरिता डिसेंबर महिन्याचा दुसरा आठवडा ते जानेवारीचा दुसरा आठवडा या कालावधीत संत्रा-मोसंबी बागेचे ओलित बंद केले जाते. या ताणाचा कालावधी जमिनीचा पोत, झाडाचे वय आणि जमिनीमध्ये उपलब्ध असलेला ओलावा यावर अवलंबून आहे. आंबिया बहारासाठी हलक्या जमिनीत ३५ ते ४५ दिवस, मध्यम जमिनीत ४५-६० दिवस आणि भारी जमिनीत ५५ ते ७५ दिवस ताण द्यावा.

भारी जमिनीत आंबिया बहार घेण्यासाठी काय करावे?

काळ्या जमिनीचा थर किमान १.२० मी पासून १५ मीटरपर्यंत असतो. या जमिनीत ताणावर झाडे सोडताच झाडाच्या मुळ्या पाण्याच्या शोधात खोलवर जातात. मुळात काळी जमीन उत्तम ओलावा टिकवून ठेवणारी असल्यामुळे झाडांना ओलावा मिळत राहतो व झाडाला ताण बसत नाही. अशा जमिनीत बगिचा संपूर्ण ऑक्टोबर, नोव्हेंबर व डिसेंबर महिन्यात, वखरून साफ ठेवावा. डिसेंबरच्या १५ तारखेच्या आसपास झाडांच्या ओळींमधून लाकडी नांगराने नांगरून झाडाच्या मुळ्या उघड्या कराव्यात. टोकावरची तंतूमुळे तुटून त्या ओलावा घेऊ शकणार नाहीत. परिणामी झाडे ताण घेतील. तसेच २ मि.लि. क्लोरमेक्वाट क्लोराईड प्रतिलिटर पाण्यात मिसळून फवारावे. हे कायिक वाढ रोखणारे संजीवक आहे.

आंबिया बहार घेण्याकरिता खताचे नियोजन

डिसेंबरच्या दुसऱ्या आठवड्यापासून ताणावर सोडल्यानंतर त्वरीत प्रत्येक झाडाला ४० ते ५० किलो शेणखत टाकून आडवी आणि उभी वखरण करावी. जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात किंवा तापमान वाढताच हलके ओलित करावे. ताण तोडतांना हलक्या ओलिताअगोदर प्रत्येक झाडाला ६०० ग्रॅम नत्र + ४०० ग्रॅम स्फुरद + ४०० पालाश आणि भरखते द्यावीत, त्यानंतर पाच ते सात दिवसांनी दुसरे पाणी (चिंबवणी) द्यावे. तिसऱ्या पाळीला भरपूर पाणी द्यावे. ताण सोडल्यावर २० ते २५ दिवसांनी फुले येतात. त्यानंतर उरलेल्या नत्राचा (अर्धा) हप्ता एक ते दीड महिन्याने किंवा फळे वाटाण्याएवढी झाल्यावर द्यावा. हलक्या जमिनीत नत्राची मात्रा तीन ते चार हप्त्यात विभागून दिल्यास जास्त फायदेशीर ठरते.

ओलित व्यवस्थापन

आंबिया बहाराची फळे उन्हाळ्यात झाडावर पोसली जातात त्यामुळे पाण्याचा साठा उन्हाळ्यात उपलब्ध असणे जरुरी आहे. जमिनीतील ओलावा कमी झाल्यास फळगळ होते व फळांची प्रत खालावते म्हणून आंबिया बहार घेतांना ओलिताकडे कटाक्षाने लक्ष देणे जरुरीचे आहे. ओलितासाठी ठिबक पद्धतीचा अवलंब केल्यास पाण्याची बचत होते. जमिनीच्या पोताप्रमाणे पाण्याच्या पाळ्या द्याव्यात.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८९५ : लुईस आणि ऑगस्ट लुइम यांनी तिकीट विक्री करून पहिल्या चित्रपटाचा पहिला शो पॅरिस येथे प्रदर्शित केला.
१८९८ : मेरी क्यूरी आणि पिअर क्यूरी यांनी प्रथमच रेडिअम हे मूलद्रव्य वेगळे केले.
१९०४ : दिल्ली ते मुंबई पहिली क्रॉस कंट्री मोटारकार रॅलीचे उद्घाटन
१९७५ : मॅक २ पेक्षा जोरात उडणारे जगातील पहिले व्यावसायिक सुपरसॉनिक टु १४४ विमानसेवा सुरू झाली.
१९७६ : कम्यूनिस्ट पार्टी ऑफ नेपाळ (मार्क्सिस्ट-लेनिनिस्ट) ची स्थापना.
१९७८ : भारताच्या माजी प्रधानमंत्रीइंदिरा गांधीयांची जेल मधून सुटका करण्यात आली.
१९८२ : टाइम मासिकातर्फे दिला जाणारा 'मॅन ऑफ द इयर' पुरस्कार प्रथमच पर्सनल कॉम्प्युटर या एका अमानवी वस्तूस देण्यात आला.
१९९१ : सोव्हिएत युनियन औपचारिकरित्या बरखास्त करण्यात आले.
१९९७ : विंदा करंदीकर यांना महाराष्ट्र फांऊडेशन पुरस्कार
२००४ : ९.३ रिश्टर तीव्रतेच्या एका भूकंपाने एक प्रचंड त्सूनामी लाट निर्माण झाली. या लाटेने भारत, श्रीलंका, इंडोनेशिया, थायलँड, मलेशिया, मालदीव आणि इतर अनेक देशात हाहा:कार माजवला. यात सुमारे २,३०,००० लोक मृत्युमुखी पडले. त्यात एका धावत्या रेल्वेगाडीतील १७०० जणांचाही समावेश होता.
२००६ : शेन वार्न ने आंतराष्ट्रीय कसोटीक्रिकेटमध्ये ७०० विकेट घेऊन एक नवीन विक्रम रचला.
२०१२ : चीनची राजधानी बीजिंग पासून तर ग्वांग्झू पर्यंत पहिल्यांदा जगातील सर्वात लांब आणि वेगवान रेल्वे रस्ता सुरु केल्या गेला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१७१६ : १८ व्या शतकातील प्रसिद्ध इंग्रजी कवी थॉमस ग्रे यांचा जन्म.
१७८५ : बेल्जियमचे पहिले पंतप्रधान एटिनी कॉन्स्टन्टाईन डी गर्लचा यांचा जन्म. (मृत्यू: १० फेब्रुवारी १८७१)
१७९१ : चार्ल्स बॅबेज - इंग्लिश गणितज्ञ, संशोधक, अभियंता आणि तत्त्वज्ञ, पहिल्या यांत्रिकी संगणकाचा जनक (मृत्यू: १८ आक्टोबर १८७१)
१८९३ : माओ त्से तुंग - आधुनिक चीनचे शिल्पकार, मुत्सद्दी, मार्क्सवादी-लेनिनवादी विचारसरणीचे पुरस्कर्ते (मृत्यू: ९ सप्टेंबर १९७६)
१८९९ : भारताचे स्वातंत्र्य सैनिक ज्यांनी जनरल डायर वर गोळ्या झाडून जालियानवाला बाग हत्याकांडा चा बदला घेतला अश्या सरदार उधम सिंग यांचा आजच्या दिवशी जन्म.
१९१४ : डॉ. मुरलीधर देविदास ऊर्फ बाबा आमटे - कुष्ठरोग्यांच्या पुनर्वसनासाठी आयुष्य वाहून घेणारे थोर समाजसेवक (मृत्यू: ९ फेब्रुवारी २००८)
१९१४ : डॉ. सुशीला नायर - स्वतंत्र भारताच्या पहिल्या आरोग्यमंत्री, महात्मा गांधींच्या स्वीय सहाय्यिका व डॉक्टर, गांधीवादी कार्यकर्त्या. त्यांनी सेवाग्राम येथे स्थापन केलेल्या एका छोट्या दवाखान्याचे आता 'महात्मा गांधी इन्स्टिट्युट ऑफ मेडिकल सायन्सेस' या मोठ्या संस्थेत रुपांतर झाले आहे. (मृत्यू: ३ जानेवारी २०००)
१९१७ : डॉ. प्रभाकर माचवे - साहित्यिक. त्यांनी हिंदी, मराठी व इंग्रजीत शंभराहून अधिक ग्रंथ लिहिले. त्यांच्या साहित्यामध्ये स्वप्नभंग, अनुक्षण, मेपल हे काव्यसंग्रह; एक तारा, दर्दके पाबंद इ. कादंबर्या; नाट्यचर्चा, समीक्षा की समीक्षा आदींचा समावेश आहे.
१९२५ : पं. कृष्णा गुंडोपंत तथा 'के. जी.' गिंडे - शास्त्रीय गायक, संगीतकार व शिक्षक (मृत्यू: १३ जुलै १९९४)
१९२९ : गुजराती साहित्यिक तारक मेहता यांचा जन्म.
१९३५ : डॉ. मेबल आरोळे - रॅमन मॅगसेसे पुरस्कार विजेत्या बहुउद्देशीय ग्रामीण आरोग्य प्रकल्पाच्या संचालिका (मृत्यू: २७ डिसेंबर १९९९)
१९४१ : लालन सारंग - रंगभूमीवरील कलाकार
१९४८ : डॉ. प्रकाश आमटे.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१५३० : बाबर - पहिला मुघल सम्राट, हिन्दुस्थानातील मुघल सत्तेचा संस्थापक (जन्म: १४ फेब्रुवारी १४८३)
१९६१ : भारताचे प्रसिद्ध स्वातंत्र्य सैनिक तसेच लेखक भूपेंद्रनाथ दत्त यांचे निधन.
१९६६ : पंजाब चे पहिले मुख्यमंत्री तसेच गांधी स्मारक निधी चे पहिले अध्यक्ष गोपी चंद भार्गव यांचे निधन.
१९७२ : हॅरी एस. ट्रूमन - अमेरिकेचे ३३ वे राष्ट्राध्यक्ष (जन्म: ८ मे १८८४)
१९८९ : केशवा तथा के. शंकर पिळ्ले - व्यंगचित्रकार व लेखक, भारतातील राजकीय व्यंगचित्रांचे जनक, पद्मविभूषण (१९७६), 'चिल्ड्रन्स बुक ट्रस्ट' आणि 'शंकर्स इंटरनॅशनल डॉल्स म्युझियम' यांचे संस्थापक (जन्म: ३१ जुलै १९०२ कायमकुलम, केरळ)
१९९९ : शंकरदयाळ शर्मा - भारताचे ९ वे राष्ट्रपती व ८ वे उपराष्ट्रपती (जन्म: १९ ऑगस्ट १९१८)
२००० : प्रा. शंकर गोविंद साठे - नाटककार आणि साहित्यिक.
२००६ : कृष्णचंद्र मोरेश्वर तथा दाजी भाटवडेकर - अभिनेते (जन्म: १९२१)
२०११ : कर्नाटकचे १५ वे मुख्यमंत्री सरेकोपा बंगारप्पा यांचे निधन. (जन्म: २६ ऑक्टोबर १९३३).

# बीड शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद ; मोकाट जनावरांमुळे नागरिक त्रस्त





## नगरपालिका प्रशासन दिशाभूल करत कागदोपत्री कारवाईत व्यस्त

बीड । प्रतिनिधी

बीडकरांची रस्त्यांवरील मोकाट कुत्री आणि जनावरांच्या त्रासापासून सुटका होण्याची शक्यता नगरपरिषद प्रशासनाच्या ढिसाळ कारभारामुळे मावळली आहे.जनावरे रस्त्यावर मोकाट सोडण्याच्या प्रकाराने नागरीकांना रस्ते,पाणी, पथदिवे आदी नागरी समस्यांनी त्रस्त असताना मोकाट कुत्री आणि जनावरांमुळे नविन समस्येत भर पडली आहे. यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी निवेदन अथवा आंदोलनानंतर नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड कागदोपत्री सर्वकाही आलबेल असल्याचे आणि दोषींवर कारवाई सुरू असल्याचे गोलगोल उत्तर देऊन जबाबदारी झटकण्याचा प्रयत्न करताना दिसत असुन कागदोपत्रीच कारवाई केल्याचे दाखवत आंदोलकांची दिशाभूल करण्यात व्यस्त असल्याचे दिसून येत असल्याचे सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांनी म्हटले आहे.

रस्त्यांवरील जनावरांच्या कळपामुळे दुचाकींच्या अपघाताचे प्रकार वाढले आहेत तर चारचाकी वाहनांचेही जनावरांच्या धडकांमुळे मोठे नुकसान होत आहे.शहरातील नगररोड, बार्शी रोड, जालना रोड या प्रमुख रस्त्यांसह शहरातील प्रमुख बाजारपेठा, शहरांतर्गत सर्वच रस्त्यांवर जनावरांचे कळप दिसुन येतात.रस्त्यांवरील जनावरांच्या कळवंड तसेच अचानक जनावरं उधळण्याने अपघातांचे प्रकार वाढले आहेत.याबाबत नगरपालिका प्रशासनाला तक्रार केल्यानंतर जुजबी कारवाई करण्यात येते. मध्यंतरी नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपरीषद बीड यांनी नगरपालिकेकडुन कोंडवाडा कार्यान्वित केला असुन प्रथम ५०० रुपये दंड भरून घेताना हमीपत्र लिहून घेणार आणि पुन्हा असा प्रकार घडला तर जनावरांच्या मालकांवर थेट गुन्हे दाखल करून जनावरेच जप्त करणार असे आश्वासन दिले होते.मात्र मुख्याधिकारी यांच्या कारवाईच्या आश्वासनांचे काय झालं असा सवाल करत ते आश्वासन कागदोपत्रीच राहिल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे. बीड जिल्हात जानेवारी २०२३ ते फेब्रुवारी २०२४ या १४ महिन्यांच्या कालावधीत १४ हजार २२१ जणांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतलेला आहे. बीड शहरात मोकाट कुत्र्यांचा उच्छाद सुरूच असुन मोकाट कुत्र्यांची संख्या वाढल्याने नागरीकांना रस्त्यावर चालणे अवघड झाले आहे.मोकाट कुत्र्यांच्या हल्ल्याच्या अनेक घटना घडल्या असुन यामुळे लहान मुले, महिला,वृद्धांमध्ये भितीचे वातावरण पसरले आहे. बीड शहरातील गांधीनगर परीसरातील एकाच दिवशी ३० शाळकरी मुलांना कुत्र्यांनी चावा घेतला होता. शाळकरी मुलांचे लचके तोडल्याची घटना अंगावर शहारे आणणारी होती.तर बीडमध्ये उपमुख्यमंत्री अजित पवार, धनंजय मुंडे यांच्यासह मंत्र्यांच्या उत्तरदायित्व सभेसाठी बीडमध्ये आलेल्या ६० नागरीकांना मोकाट कुत्र्यांनी चावा घेतला होता. नीता अंधारे मुख्याधिकारी नगरपालिका बीड मात्र शहरातील मोकाट कुत्र्यांची नसबंदी करणेबाबत दरवर्षी जाहीर निविदा प्रसिद्ध करण्यात येत आहे परंतु एकही निविदा प्राप्त न झाल्यामुळे याबाबतीत पुढील कार्यवाही झाली नाही. याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येईल असे लेखी आश्वासन देऊन वेळ मारून नेत असल्याचे डॉ.गणेश ढवळे यांनी म्हटले आहे.

## थोडक्यात



### माजी पंतप्रधान अटलबिहारी वाजपेयी यांची जयंती साजरी

धारूर । प्रतिनिधी

देशाचे माजी पंतप्रधान भारतरत्न डॉ. अटल बिहारी वाजपेयी यांची जयंती भारतीय जनता पार्टीच्या वतीने कैप्टन राजपाल सिंह भैया हजारी इंग्लिश स्कूल या ठिकानी सुशासन दिवस म्हणून साजरी करण्यात आली. आज दिनांक २५/ १२/ २०२४ रोजी किल्ले धारूर येथील भारतीय जनता पार्टीच्या वतीने कैप्टन राजपाल सिंह भैया हजारी इंग्लिश स्कूल या ठिकानी सुशासन दिवस व माजी पंतप्रधान भारतरत्न अटल बिहारी बाजपेयी यांची जयंती साजरी करण्यात आली त्यावेळी आपल्या भाषणात नगर अध्यक्ष डॉ.स्वरूपसिंह हजारी साहेब म्हणाले की देशाच्या संसदेत पन्नास वर्ष कार्यरत असणारे व्यक्तिमत्व अटलजी होते स्व पक्षांप्रमाणेच विरोधी पक्षांमध्ये त्यांचा सन्मान होता राष्ट्रभक्तीने प्रेरित असा नेता देशवासियांसाठी प्रेरणास्थान आहे ज्यावेळेस ते पंतप्रधान असताना एक मताने सरकार जात होते तरीपण त्यांनी कोणतीही तडजोड केली नाही सन्मानपूर्वक पंतप्रधानपदाचा राजीनामा दिला असे अटलजी प्रत्येक भारतीयांच्या हृदयात आज सामावलेले आहेत आणि आपण त्यांच्याच विचारसरणी वर चालतो अटलीजी यांच्या जिवन कार्याची माहीती सांगीतली.या प्रसंगी भाजपा प्रदेश कार्यकारणी सदस्य तथा नगराध्यक्ष डॉ. स्वरूपसिंह हजारी साहेब, तालुका अध्यक्ष ॲड. बालासाहेब चोले शहराध्यक्ष दत्ताभाऊ धोत्रे, भाजपा युवा मोर्चा शहर अध्यक्ष एडवोकेट मोहन भोसले सोशल मीडिया संयोजक रोहनसिंह हजारी नगर सेवक सुरेश लोकरे यूवा नेते रामप्रभु मुंडे माजी सरपंच मल्हारी भालेराव, साहेबराव चव्हाण ज्येष्ठ अहमद भाई संदीप काचगुंडे राधाकृष्ण चोले यांच्या सह भारतीय जनता पार्टीचे पदाधिकारी मोठया प्रमाणात उपस्थित होते.

### स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी मोर्चात सामील व्हा

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यातील मस्साजोग येथील सरपंच स्व. संतोष देशमुख यांची निघृण हत्या करणाऱ्या क्रूरकर्त्यांना तातडीने अटक करून त्यांना फाशीची शिक्षा व्हावी या मागणीसाठी २८ डिसेंबर २०२४ रोजी सकाळी ११:०० वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथून काळे कपडे, काळे झेंडे, आंधळकोट मूक मोर्चा पोलीस अधीक्षक कार्यालयावर मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. यात नागरिकांनी लाखोंच्या संख्येने सहभागघ व्हावे असे आवाहन मुस्लिम पक्ष शिष्टमंडळाने केले आहे. यात मुस्लिम समाजानेही हजारोंच्या संख्येने सहभाग घ्यावा असे आवाहन माजी सभापती जलील पठाण, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते तथा नेते शेख अखील भाई, माजी उपाध्यक्ष नसीम भाई इनामदार, माजी उपाध्यक्ष शाकेर भाई, अय्यूब खान, शेख अय्युब शेख रहीम यांनी आवाहन केले आहे.




याविषयी थोडक्यात वृत्त असे की, सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करून खून करण्यात आला. बीडचे बिहार करण्याचा प्रयत्न केला जात आहे. स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी बीडमध्ये सर्वपक्षीय, सर्वजातीय, सर्वधर्मीय मोर्चा निघणार आहे. स्व. संतोष देशमुख यांना न्याय देण्यासाठी सोमवारी सर्वपक्षीय, सर्व समाज आणि संघटनांची एकत्र बैठक बीड शहरातील आशीर्वाद लॉन्स येथे आयोजित करण्यात आली होती. यात सर्वपक्षीय बैठकीत दिनांक २८ रोजी शनिवारी सकाळी ठीक ११:०० अकरा वाजता डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक ते पोलीस अधीक्षक कार्यालयापर्यंत मूक मोर्चा काढण्यात येणार आहे. या मुख्य मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने या मोर्चामध्ये सहभाग नोंदवावा. असे आवाहन मुस्लिम समाजातील राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार यांच्या गटातील जलील पठाण, शेख अखील, नसीम इनामदार, शेख शाकेर, अफसर खान, शेख अय्युब, शेख रहीम आदींनी मुक मोर्चामध्ये लाखोंच्या संख्येने सामील व्हावे असे आवाहन केले आहे.

## दैनंदिन व्यवहारासाठी डिजिटल व्यवहाराचा मोठ्या प्रमाणात वापर-डॉ. पांचाळ

जालना । प्रतिनिधी

डिजिटल व्यवहार हा आता आपल्या दैनंदिन जीवनाचा भाग झाला असुन त्याचा मोठ्या प्रमाणात वापर होत आहे. डिजिटल तंत्रज्ञानाच्या प्रगतीमुळे सर्व प्रकारचे व्यवहार सोपे झाले असतानाच याच तंत्रज्ञानाचा वापर करून ग्राहकांच्या फसवणुकीचे प्रकारही वाढले असल्याचे जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ म्हणाले.येथील जिल्हाधिकारी कार्यालयातील महसूल भवन येथे राष्ट्रीय ग्राहक दिनाचे आयोजन करण्यात आले होते, त्याप्रसंगी जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ बोलत होते. यावेळी जिल्हा ग्राहक तक्रार निवारण आयोगाच्या अध्यक्ष श्रीमती अपर्णा काटे, वरिष्ठ न्यायाधीश तथा जिल्हा विधी सेवा प्राधिकरणच्या सचिव श्रीमती प्रणिता भारसाकडे-वाघ, जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर, तहसिलदार श्रीमती छाया पवार यांची प्रमुख उपस्थिती होती.




यावेळी डॉ. पांचाळ पुढे म्हणाले की, आजचे युग हे डिजिटल युग असुन, वेळेची आणि पैशाची बचत करण्यासाठी प्रत्येक जण आज डिजिटल व्यवहाराचा मोठ्या प्रमाणात वापर करत आहेत. परंतू डिजिटल व्यवहार करतांना फसवणूकीचे प्रकार वाढल्याने प्रत्येकाने सतर्क राहणे देखील आवश्यक आहे. ऑनलाईन किंवा डिजिटल व्यवहार करतांना अनोळखी लिंक किंवा ओटीपी बाबत सावध भूमिका घेणे आवश्यक आहे. तसेच फसवणूक झाल्यास ऑनलाईन तक्रार देखील नोंदविणे आवश्यक आहे. तसेच ग्राहकांना सुरक्षित डिजिटल व्यवहाराबद्दल जागरूकता देखील निर्माण करणे आवश्यक आहे. श्रीमती अपर्णा काटे म्हणाल्या की, न्यायालयात लवकरच व्हर्च्युअल आभासी सुनावणी आणि ग्राहक न्यायासाठी डिजिटल सुविधा सुरु होणार आहे. यामुळे नागरिकांचा वेळ आणि पैसे या दोन्हीची बचत होणार आहे. व्हर्च्युअल सुनावणी सुरु होणार असल्याने नागरिकांमध्ये जनजागृती करणे आवश्यक आहे. ज्यामुळे या सुविधांचा सर्वांना वापर करणे सोयीचे होईल. जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती सविता चौधर प्रास्ताविकात म्हणाल्या की, २४ डिसेंबर, १९८६ या दिवशी ग्राहक हक्क कायद्याला मंजुरी मिळाल्याने दरवर्षी २४ डिसेंबर हा दिवस 'राष्ट्रीय ग्राहक दिन' म्हणुन साजरा केला जातो. ग्राहक संरक्षण कायद्यामुळे प्रत्येक भारतीय ग्राहकाला हक्क प्राप्त झालेले आहेत. यावेळी कार्यक्रमास जिल्हा ग्राहक संरक्षण परिषदेचे सदस्य आणि नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.



## परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेस सुरूवात

जालना । प्रतिनिधी

यावर्षीचे यजमान पद जालना पोलीस घटकाकडे देण्यात आली आहे. त्या अनुषंगाने दरवर्षी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रामध्ये पोलीसांच्या क्रिडा स्पर्धांचे आयोजन केले जाते. या स्पर्धामध्ये छत्रपती संभाजीनगर शहर, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, जालना, बीड, धाराशिव अशा घटकांचे संघ भाग घेतात. या स्पर्धांमध्ये फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॅन्डबॉल, कबडडी, खो-खो, ॲथेलेटिक्स, ज्युदो, कुस्ती, बॉक्सींग, वु-शु, तायक्वाँदो, जलतरण असे क्रिडा प्रकार घेतले जातात.

यावर्षी छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्रीय पोलीस क्रिडा स्पर्धेचे यजमान पद जालना पोलीस दलाकडे असुन सदर क्रिडा स्पर्धा या जालना पोलीस मुख्यालयाच्या मैदानावर आयोजित केलेल्या आहेत. यास्पर्धा दिनांक २२/१२/२०२४ ते २८/१२/२०२४ यादरम्यान घेण्यात येत आहेत. या स्पर्धांमध्ये फुटबॉल, हॉकी, व्हॉलीबॉल, बास्केटबॉल, हॅन्डबॉल, कबडडी, खो-खो, ॲथेलेटिक्स, ज्युदो, कुस्ती, बॉक्सींग, वु-शु, तायक्वाँदो, जलतरण अशा विविध प्रकारच्या १७ क्रिडा प्रकारामध्ये पोलीस आयुक्तालय, छत्रपती संभाजीनगर शहर, पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर ग्रामीण, जालना, बीड, धाराशिव या पाच घटकातील एकुण ५०० पोलीस खेळाडू यांनी सहभाग घेतला आहे. या स्पर्धेचा समारोप दि.२८/१२/२०२४ रोजी होणार असुन समारोप कार्यक्रमासाठी श्री. विरेंद्र मिश्र, (भा.पो.से.), विशेष पोलीस महानिरीक्षक, छत्रपती संभाजीनगर परिक्षेत्र, छत्रपती संभाजीनगर, श्री. प्रविण पवार, (भा.पो.से.), पोलीस आयुक्त, छत्रपती संभाजीनगर, श्री. अजयकुमार बंसल, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, जालना, श्री. विनयकुमार राठोड, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, छत्रपती संभाजीनगर (ग्रामीण), श्री. संजय जाधव, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, धाराशिव, श्री. नवनीत कावत, (भा.पो.से.), पोलीस अधीक्षक, बीड असे हजर राहणार आहेत. सदर कार्यक्रमाचे आयोजन मा. पोलीस अधीक्षक श्री. अजयकुमार बंसल व मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी यांच्या मार्गदर्शनाखाली जालना पोलीस दलातील पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांनी केले आहे

## जनतेचा जीवन सुखकारक व्हावेसाठी जालन्यात महाचिंतनी; आ.खोतकर यांच्या कडून पाहणी

जालना । प्रतिनिधी

जनतेचे जीवन सुखकारक व्हावे, मानवी जीवनमूल्ये समाजात रुजावीत, माणुसकीचा धर्म वृद्धिंगत व्हावा या उद्देशाने महंत प.पू. बा.भो.शास्त्री यांनी सुरू केलेली महाचिंतनी डॉ. बळीराम बागल आणि चिंतनी परिवाराच्या सहभागातून नववर्षाच्या प्रारंभी दि.०९ ते ११ जानेवारी २०२५ दरम्यान जालना शहरात अंबड चौफुली जवळील राजपूत वाडी नजीक ज्ञान संजीवनी कॅम्पस परिसरात आयोजित करण्यात आली आहे. तीन दिवस विविध जाती, धर्म, संप्रदायातील प्रख्यात विचारवंत, मानवी कल्याण, जागतिक समस्या, विचार प्रकट करणार आहेत.



महाचिंतनी च्या पार्श्वभूमीवर मंगळवारी ( ता. २४) स्वागताध्यक्ष आ. अर्जुनराव खोतकर, महाराष्ट्र शासनाचा ज्ञानोबा-तुकोबा पुरस्कार प्राप्त महंत बा. भो. शास्त्री, सुदाम शास्त्री, डॉ. बळीराम बागल, अनिरुद्ध खोतकर, पंडितराव भुतेकर, रामेश्वर पाटील भांदरगे,गुलाबराव पाटील,संतोष मोहिते, प्रा डॉ. आत्मानंद भक्त, अरूण काकडे, ॲड. राहुल हिवराळे, विकास क्षीरसागर, करण दोडके, गणेश सुरोशे, आनंद जाधव, आदींनी ज्ञान संजीवनी कॅम्पस परिसरात जाऊन पाहणी केली.मराठवाड्यासह राज्यभरातून सुमारे २५ ते, ३० हजार भाविक उपस्थित राहणार आहेत. त्यांच्या निवास, भोजनाची व्यवस्था केली जाणार आहे.भाविकांची गैरसोय होऊ नये यासाठी नियोजन बध्द पणे आखणी केली जात आहे.

## सोमवारी प्लेसमेंट ड्राईव्ह जागेवर निवड संधीचे आयोजन

जालना । प्रतिनिधी

जिल्ह्यातील नोकरीच्या शोधात असलेल्या युवक-युवतींना विविध खासगी कंपन्या, कारखाने, उद्योग-व्यवसाय आणि आस्थापना यांचेकडील रोजगाराच्या संधी उपलब्ध करण्याच्या उद्देशाने रोजगार सहाय्यासाठी विशेष मोहिम सुरू करण्यात आली आहे. याप्रमाणे जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर जालना यांच्यामार्फत जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, जालना येथे सोमवार दि. ३० डिसेंबर, २०२४ सकाळी ११ ते २ वाजेपर्यंत प्लेसमेंट ड्राईव्ह-जागेवर निवड संधी आयोजित करण्यात आली आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या .... या संकेतस्थळाला भेट द्यावी, असे आवाहन सहायक आयुक्त, कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता, जालना यांनी प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

भूमी कॉटेक्स प्रा.लिमिटेड जालना यांची पदवी उत्तीर्ण करिता सुपरवायझर पदासाठीचे ०४ पदे, तसेच लेखा विषयक अनुभव असलेल्या बी.कॉम उत्तीर्ण करिता लेखापाल करिता ०३ पदे, आय.टी.आय इलेक्ट्रिशियन उत्तीर्ण करिता ०६ पदे, कोणतीही पदवीधर उत्तीर्ण करिता वजन काटा ऑपरेटर साठी १ पद, आय.टी.आय फिटर उत्तीर्ण करिता ३ पदे, बारावी उत्तीर्ण करिता मशीन हेल्परची ३ पदे तसेच बी.कॉम पदवी उत्तीर्ण करिता डाटा एन्ट्री ऑपरेटर ची २ अशी एकूण २२ रिक्त पदे प्राप्त झालेली आहेत. नोकरी इच्छुक पात्रताधारक उपस्थित होणा-या उमेदवारांच्या प्रत्यक्ष मुलाखती घेण्यात येवून जागेवरच निवडीची संधी उपलब्ध आहे. जालना जिल्ह्यातील नोकरी इच्छुकांनी या संधीचा लाभ व अधिक माहिती घेण्यासाठी विभागाच्या .... या वेबसाईटला भेट द्यावी. यापूर्वी नोंदणी केली नसल्यास प्रथम आपली नोंदणी करावी आणि होम पेज वरील नोकरी साधक लॉगिन मधून आपल्या युजर आयडी व पासवर्ड च्या आधारे लॉगिन करावे. त्यानंतर डॅसबोर्ड मधील पडित दीनदयाळ उपाध्याय जॉब फेअर या बटनावर क्लिक करून जालना जिल्हा निवडून त्यातील प्लेसमेंट ड्राईव्ह ०४ याची निवड करावी. उद्योजक, नियोक्तानिहाय त्यांच्याकडील रिक्त पदांची माहिती घ्यावी. याप्रमाणे आवश्यक किमान पात्रता धारण करीत असल्याची खात्री करून उपलब्ध असलेल्या रिक्त पदासाठी ऑनलाईन पद्धतीने आपला पसंती क्रमांक नोंदवावा आणि किमान दोन प्रतीत बायोडाटासह फोटो,शैक्षणिक व व्यावसायिक पात्रता आदि कागदपत्रे कंपनींना देण्यासाठी छायांकित प्रती संच सोबत ठेवून सोमवार दि. ३० डिसेंबर,२०२४ रोजी सकाळी ११ ते दुपारी २ वाजेपर्यंत प्रत्यक्ष मुलाखतीसाठी जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, मॉडेल करिअर सेंटर, प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, जालना येथे उपस्थित राहून या प्लेसमेंट ड्राईव्हमध्ये सहभागी व्हावे आणि रोजगाराच्या या पर्वणीचा निश्चित लाभ घ्यावा. असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे

## डॉ.प्रितमताईच्या पाठीवर शाब्बासकीची थाप पडणारच!

पाटोदा

३१ डिसेंबर २०२४ च्या सुर्यास्ताला निरोप देताना आणि २०२५ च्या सुर्योदय समयी बीड जिल्ह्यासाठी अत्यंत आनंदाची गोष्ट म्हणजे अखेर रेल्वे जिल्ह्यात आली नव्हे तर बीडच्या शिवारात येवुन ठेपली. काही दिवसांतच परळीत दाखल होईल. काम प्रगतीपथावर असुन केंद्र सरकार निधी उपलब्ध करून देत असल्याने गती वाढली नक्कीच. एक निश्चित आहे की, रेल्वेचा प्रश्न केवळ माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांच्या अथक परिश्रमातुन मार्गी लागला. त्या आज खासदार जरी नसल्या तरी त्यांच्या पाठीवर जिल्ह्याच्या वीस लाखापेक्षा जास्त लोकांकडून कौतुकाची थाप पडल्याशिवाय रहाणार नाही. कारण एकदाचं स्वप्न साकार झालं असं आपण म्हणु शकतो.

पन्नास वर्षाचं स्वप्न खर्या अर्थाने सरलेल्या वर्षात आणि आता नविन वर्षाच्या प्रारंभी साकारतेय ते रेल्वे प्रश्नाचं. एक गोष्ट निश्चित म्हणावी लागेल की या प्रश्नावर पन्नास वर्षापेक्षा अधिक वर्षे लोकांनी संघर्ष केला आणि स्वप्न पाहिले. कालपरत्वे तत्कालीन व्यवस्थेत असणार्या सर्वच विविध पक्षाच्या नेत्यांनी विषय पुढे घेवुन जाण्यासाठी प्रयत्न



केलेच पण स्व.गोपीनाथराव मुंडेंनी हा प्रश्न खर्या अर्थाने लावुन धरला. त्यांच्या दुर्दैवी निधनानंतर खासदार पदावर डॉ.प्रितमताई मुंडेंना संधी मिळाली. २०१४ ते २०२४ पर्यंत त्यांनी रेल्वे प्रश्नावर राजकिय तपश्चर्या करताना प्रोजेक्ट म्हणुन स्वतंत्रपणे विशेष लक्ष्य घातले. जेष्ठ भगिनी पंकजाताई मुंडे तत्कालीन काळात कॅबीनेट मंत्री होत्या. सुवर्णकाळ खर्या अर्थाने जिल्हावासियांच्या साठी म्हणावा लागेल. देशाच्या पंतप्रधानांनी एका फोनवर खरं तर त्यावेळी स्व.गोपीनाथराव मुंडेंची जयंती औचित्य साधुन रेल्वेप्रश्नासाठी २३०० कोटी रूपायांचा निधी मंजुर केला आणि खर्या अर्थाने गती मिळाली. अर्थात हे खरं आहे की, कुठलाही प्रकल्प पुर्ण करण्यासाठी शासन स्तरावर खुप कठोर परिश्रम घ्यावे लागतात. मग संबंधित अधिकार्यांच्या गाठीभेट घेणे असेल, मंत्र्यांना निवेदन देणे असेल, भुसंपादनाचे विषय, निधीची उपलब्धता या सार्या गोष्टी नाही म्हटलं तर ५०० पेक्षा जास्त बैठका डॉ.प्रितमताई मुंडेंनी संबंधित यंत्रणेच्या बीड, मुंबई, दिल्लीत घेतल्या. काम करताना नेत्याच्या अंगी असलेली जिद्द, त्यातला चिकाटीपणा खर्या अर्थाने कुठलाही प्रकल्प तडीस लावण्यासाठी कारणीभुत ठरतो.

प्रितमताई मुंडेंनी या प्रश्नावर स्वत:ला झोकुन दिले होते. रात्रंदिवस ध्यास घेताना ज्यांना रेल्वेताई अस देखील लोकांनी म्हटलं. कामाची प्रगती पहाण्यासाठी स्वत: कितीतरी वेळा साईड सुपरविजिन त्यांनी केलं. एक-दोन-तीन असे टप्पे कामाचे पुर्ण होताना मध्यंतरी आष्टी तालुक्यात अहिल्यानगरहुन रेल्वे येवुन त्यांच्याच काळात धडकली होती. खरं तर २०१९ राज्यात व्यवस्था बदल झाला आणि उद्धव ठाकरे मुख्यमंत्री असताना या प्रश्नाला गती मिळाली नाही. पुन्हा एकनाथ शिंदे यांचे सरकार आले त्यात गती मिळाली. केंद्र सरकारकडून अर्थसंकल्पात खासदार नात्याने मोठ्या प्रमाणात तरतुद करून घेतली. रेल्वे कधी येणार?कधी येणार? याकडे सार्यांच्या नजरा लागल्या असताना खर्या अर्थाने हे स्वप्न ३१ डिसेंबर २०२४ सुर्यास्ताला निरोप देताना साकार होतंय. कारण विघणवाडी ते राजुरी रेल्वेमार्गाची चाचणी होत आहे आणि राजुरी अर्थातच बीडच्या दारात रेल्वे आली असं म्हणायला हरकत नाही. अहिल्यानगर-बीड-परळी २६१ किमी टप्पा असुन अंमळनेर ते विघणवाडीपर्यंत चाचणी यापुर्वी झाली.

आता विघणवाडी ते राजुरी चाचणी होवु शकते. त्यामुळे नव्या वर्षात रेल्वे परळीला पोहोचेल आणि खर्या अर्थाने आता जिल्हावासियांचे स्वप्न साकार झालं असं म्हणता येईल. माजी खा.डॉ.प्रितमताई मुंडे यांचे योगदान शंभर टक्के असुन ते कुणी नाकारू शकत नाही. कारण दुसर्या कुणाला हा प्रश्न मार्गी लागणे शक्य झालेच नसते. प्रितमताईचा ड्रिम प्रोजेक्ट म्हणुन हा प्रकल्प आजन्म ओळखल्या जाईल. एवढेच नव्हे तर त्या आज खासदार पदी नसल्या तरी या प्रश्नांसाठी त्यांच्या पाठीवर शाब्बासकीची थाप निश्चितच पडु शकते.

# अंबाजोगाईत मनुस्मृती दहन करून केला विषमतावादी व्यवस्थेचा निषेध

**अंबाजोगाई । प्रतिनिधी**

**अंबाजोगाईत बुधवारी मनुस्मृती दहन करून विषमतावादी व्यवस्था नाकारत शासन व प्रशासनाचा जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला. यावेळी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर भारतीय संविधान प्रेमी नागरिकांकडून महामानव डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नांवाचा जयघोष करण्यात आला.**

यावेळी संविधान प्रेमी नागरिकांकडून बुधवार, दिनांक २५ डिसेंबर रोजी उपविभागीय अधिकारी कार्यालयासमोर निदर्शने करण्यात आली. तर सहभागी आंदोलकांनी मनुस्मृती दहन केले. यावेळी कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भीमराव सरवदे, आर.जी.मस्के, अशोक पालके, राजेश वाहुळे, धीमंत राष्ट्रपाल, विनोद शिंदे, हमीद चौधरी यांनी उपस्थित संविधान प्रेमी नागरिकांना संबोधित केले. उपविभागीय अधिकारी यांना देण्यात आलेल्या निवेदनात नमूद करण्यात आले आहे की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी दिनांक २५ डिसेंबर १९२७ रोजी महाड या ठिकाणी मनुस्मृतीचे दहन करून येथील विषमतावादी व्यवस्था नाकारली, स्त्रियांना गुलामगिरीतुन मुक्त केले. परंतु, आजही या देशामध्ये संविधान लागु असतांना सुध्दा येथे मनुचा विचार जपला जातो. राजस्थान मध्ये जाहिररित्या मनुचे मंदीर बांधले जाते, रोज स्त्रियांना गुलाम बनविणारे विचार जाहिररित्या पेरले जातात, सनातनी कॉर्पोरेट सत्ता भारतात आणि महाराष्ट्र राज्यात आल्यापासून दलीत, अदिवासी, अल्पसंख्याक यांना लक्ष करून पोलीसांमार्फत यांची दडपशाही केली जातेय. मनुची विषमतावादी व्यवस्था टिकविण्यासाठी शासन व प्रशासन काम करीत आहे. या विषमतावादी व्यवस्थेचा आम्ही जाहिर निषेध करून त्या मनुची मनुस्मृती नाकारत आहोत. असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे. सदरील निवेदनावर निवेदक कॉ.बब्रुवाहन पोटभरे, भिमराव सरवदे, आर.जी.मस्के, अशोक पालके, धीमंत राष्ट्रपाल, विनोद शिंदे, हमिद चौधरी, राजेश वाहुळे, अनिल ओव्हाळ,



अशोक ढवारे, अविनाश कुऱ्हाडे, रवि आवाडे, मुक्ता वायदंडे, बादल तरकसे, प्रेम माने, वैजनाथ वाघमारे, मनिष आदमाने, संघपाल तरकसे, गुलनाज शेख, अमोल सरवदे, अजय गोरे, बाबा शेख, प्रदीप वारकरी, राकेश काळे, सुशिल गायकवाड, दिलीप गोरे, राम काटे, हनुमंत गायकवाड, विद्या गायकवाड, मंजुषा कसबे, आरोही कसबे, छाया कसबे, लक्ष्मी कसबे, सुनंदा जोगदंड, विद्या गावडे, उषा गायकवाड यांच्या स्वाक्षऱ्या आहेत. या प्रसंगी विशाल पोटभरे, अमर वाघमारे यांच्यासह अनेकांची उपस्थिती होती. 'ग्रंथाची विक्री थांबवून फौजदारी कारवाई करा' : मूळ संस्कृत भाषेत असलेल्या या ग्रंथाचे संपूर्ण मराठीत भाषांतर करण्यात आले असून राज्यभरातील पुस्तकालयांमधून विक्रीही होत आहे. दलित, पीडित आणि शोषितांना, विशेषत: महिलांना गुलाम बनविण्याचे धडे देणाऱ्या या ग्रंथाविरूद्ध पहिल्यांदाच मोठ्या प्रमाणावर जनमानस पेटून उठून २५ डिसेंबर १९२७ रोजी डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी या ग्रंथाचे जाहीरपणे दहन केले होते. पुढे पुरोगामी राज्य म्हणून ओळखल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्याने काही वर्षांपूर्वी या ग्रंथाच्या प्रकाशन व विक्रीवर बंदी घातली होती. परंतु, बंदी आदेशाची अंमलबजावणीच करण्यात आली नव्हती. प्रत्यक्षरीत्या हा ग्रंथ नेमका कोणी आणि कोणत्या कालखंडात लिहिला याचा अद्यापही शास्त्रोक्त शोध लागलेला नाही. ब्रह्मदेवाचा पहिला सुपुत्र मनू याने हा ग्रंथ लिहिला असून प्राचीन हिंदू धर्मशास्त्रत त्याला मान्यता आहे. त्याला विधी ग्रंथही म्हटल्या जाते. इंग्रज राजवटीत सर विलियम जोन्स यांनी १७९४ मध्ये या ग्रंथाचे इंग्रजीत भाषांतर केले होते. त्यांनी या ग्रंथाचा भाग हिंदू कायद्यात समाविष्ट करण्याचा प्रयत्न केला होता. या ग्रंथाचा संदर्भ देऊन विविध समाज बांधवांच्या भावना दुखावण्यात आलेल्या आहेत. तसेच या ग्रंथात कोणतीही स्त्री स्वातंत्र्ययोग्य नाही असे नमूद केले आहे. या ग्रंथातून दलित, पीडित, आदिवासी, अल्पसंख्यांक आणि शोषितांना, विशेषत: महिलांना गुलाम बनविण्याचे धडे दिले जातात. त्यामुळे या ग्रंथाची विक्री थांबवून फौजदारी कारवाई करा. कारण, सनातनी कॉर्पोरेट सत्ता भारतात आणि महाराष्ट्र राज्यात आल्यापासून दलीत, अदिवासी, अल्पसंख्याक यांना लक्ष करून पोलीसांमार्फत यांची दडपशाही केली जातेय. मनुची विषमतावादी व्यवस्था टिकविण्यासाठी केंद्र व राज्यातील शासन व प्रशासन काम करीत आहे. या विषमतावादी व्यवस्थेचा आम्ही जाहिर निषेध करून त्या मनुची मनुस्मृती नाकारत आहोत.

– कॉ.बब्रुवाहन पोटभरे – (निमंत्रक, जाती अंत संघर्ष समिती, बीड.)

# बेशिस्त ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर चालकांवर कारवाई करण्याची नागरिकांची मागणी

माजलगाव । प्रतिनिधी

ऊस वाहतूक करणारे ट्रॅक्टर चालक बेशिस्त व अतिवेगाने वाहन चालवत असल्यामुळे माजलगाव शहर व ग्रामीण भागात अपघातांचे प्रमाण वाढले आहे.यामुळे नागरिकांच्या जीवितास मोठा धोका निर्माण झाला आहे.हा विषय गंभीर असून त्यावर उपाययोजना करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे

सध्या ऊस तोडणीच्या हंगामामुळे रस्त्यावर मोठ्या प्रमाणात ऊस वाहतूक करणाऱ्या



ट्रॅक्टरची वाहतूक सुरू आहे. मात्र,अनेक ट्रॅक्टर चालक बेशिस्तीपणे कोणत्याही वाहतुकीचे नियम पाळत नाहीत. काही वेळा ओव्हरलोड वाहतूक,अंधुक दिव्यांचा वापर, वाहनातील साउंड चा कर्णकर्कश आवाज,तसेच रात्रीच्या वेळी निष्काळजीपणे वाहन चालविले जाते.यामुळे रस्त्यावरील इतर वाहनचालक व पादचारी मोठ्या अडचणीत येत आहेत.त्यामुळे अनेक अपघात घडले असून त्यात काही लोकांनी आपले प्राण

◀◀ पान ३ वर

ट्रॅक्टर वाहतुकीसाठी नियमांची कडक अंमलबजावणी करावी साउंडच्या मोठमोठ्याने होणाऱ्या कर्णकर्कश आवाजावर बंदी घालण्यात यावी, रात्रीच्या वेळी वाहतुकीसाठी अयोग्य दिवे वापरणाऱ्या ट्रॅक्टर चालकांवर कारवाई करावी.ट्रॅक्टर चालकांना वाहतुकीचे नियम पाळण्यासाठी विशेष प्रशिक्षण देण्यात यावे. अपघातप्रवण ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवावा.वाहने रस्त्याच्या बाजुला सोडा

या संदर्भात पोलिस प्रशासनाने तत्काळ उपाययोजना करून नागरिकांच्या मागण्यांचा विचार करावा,अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.भविष्यात होणारे अपघात टाळण्यासाठी पोलिस प्रशासन व स्थानिक प्रशासनाने संयुक्तपणे काम करणे गरजेचे आहे.

# संतोष देशमुख निर्घृण हत्या प्रकरण : सर्वपक्षीय मोर्चामध्ये आ.सुरेश धस होणार सहभागी

**आष्टी । प्रतिनिधी**

**मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांच्या निर्घृण हत्या प्रकरणी दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी आयोजित बीड येथील सर्व पक्षीय मोर्चा मध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस सहभागी होणार आहेत.**

याविषयी अधिक माहिती अशी की, मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत क्रूर पद्धतीने हत्या करण्यात आलेली आहे या खून प्रकरणातील सर्व आरोपी आरोपी आणि सूत्रधार यांना अटक



करण्यात यावी या मागणीसाठी जिल्हा पोलीस अधीक्षक कार्यालयावर दि.२८ डिसेंबर २०२४ रोजी सर्वपक्षीय मोर्चा आयोजित करण्यात आला आहे. या मोर्चामध्ये आष्टी विधानसभा मतदारसंघाचे भारतीय जनता पार्टीचे आमदार सुरेश धस सहभागी होणार आहेत.. नव्याने स्थापन झालेल्या महाराष्ट्र राज्य विधान मंडळ नागपूर येथील हिवाळी अधिवेशनामध्ये आमदार सुरेश धस यांनी या हत्येप्रकरणी अत्यंत अभ्यासपूर्ण, आक्रमकपणे आणि प्रभावीपणे सभागृहामध्ये या अमानवी क्रूर पध्दतीने केलेल्या हत्येचा घटनाक्रम सांगत बीड जिल्ह्यातील कायदा आणि सुव्यवस्था रसातळाला मिळवण्याचे काम गेल्या पाच वर्षात कोणी केले आहे? याचा शोध घेण्याची मागणी करून अत्यंत गरीब घराण्यातील सरपंचाची हत्या करून

◀◀ पान ३ वर

# पात्रूड गल्लीतील हातभट्टी दारू अड्डयावर पोलिसांचा छापा

**बीड । प्रतिनिधी**

**बीड शहरातील सुभाष रोड लगत असलेल्या पात्रूड गल्ली भागात एका पत्र्याच्या शेडमध्ये हातभट्टी दारू तयार करण्याच्या प्रक्रिया चालू असताना या ठिकाणी बीड शहर पोलिसांनी धाड टाकून जवळपास १०० लिटर रसायन ज्याची किंमत ३१ हजार आठशे रुपये आहे आणि दोन हजार रुपयाचे हातभट्टी दारू असा ३३८०० रुपयाचा मुद्देमाल जप्त केला. ही कारवाई बीड शहर पोलिसांनी केली ही कारवाई दिनांक २५ डिसेंबर रोजी सकाळी आठ वाजता बीड शहर पोलिसांनी केली.**

बीड शहर पोलिसांना पात्रूड गल्ली भागात पत्र्याच्या शेडमध्ये हातभट्टी दारू तयार केली जात असल्याची माहिती खबऱ्यांकडून मिळाल्यानंतर या ठिकाणी सकाळी आठ वाजता धाड टाकली असता एका पडक्या जागेत



पत्र्याच्या शेडमध्ये १०० लिटर रसायन आणि दोन हजार रुपयाची हातभट्टी दारू असा एकूण ३३ हजार आठशे रुपयांचा मद्देमाल पोलिसांनी जप्त केला. मात्र ही धाड पडल्यानंतर हातभट्टी दारू तयार करणारा राकेश प्रभाकर उर्फ गुडबा जाधव हा फरार झाला. ही कारवाई पोलीस निरीक्षक बल्लाळ यांच्या मार्गदर्शनाखाली स.पो.नि.राठोड, सहाय्यक फौजदार शिरसाट ,पोलीस हवालदार तांबारे, पोलीस शिपाई सय्यद, पोलीस शिपाई परजणे, पोलीस हवालदार सानप यांनी केली. याप्रकरणी पोलीस हवालदार आदिनाथ जगन्नाथ सानप यांच्या फिर्यादीवरून राकेश प्रभाकर उर्फ गुडबा जाधव वय ३० राहणार पात्रूड गल्ली याच्या विरोधात कलम ६५ (इ)(फ) म.दा.का. नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून या प्रकरणाचा तपास आदिनाथ सानप करीत आहेत.

# ओवी बडे यांच्या वाढदिवसानिमित्त चौंडी जि.प.शाळेत १२८ दप्तर आणि पुस्तकांचे वाटप

बीड । प्रतिनिधी

बीड येथील अभियंता विश्वजीत बडे यांनी आपली कन्या ओवी हिच्या वाढदिवसानिमित्त धारूर तालुक्यातील चौंडी येथील जिल्हा परिषद शाळेमध्ये सर्वच विद्यार्थ्यांना १२८ दप्तर आणि इंग्लिश स्पोकन पुस्तकांचे वाटप केले या अभिनव उपक्रमाचे सर्वत्र स्वागत होत आहे.

वास्तवीक पाहता जिल्हा परिषद शाळेला शक्यतो कोणी भेट देत नाही. मात्र बडे यांनी हा



आगळावेळा उपक्रम राबवून या शाळेतील सर्वच विद्यार्थ्यांना दर्जेदार दप्तरांचे वाटप केले. धारूर तालुक्यातील गावंदरा येथील मूळचे रहिवासी असलेले अभियंता विश्वजीत बडे यांनी आपली सात वर्षाची कन्या ओवी हिचा वाढदिवस आगळ्या वेगळ्या पद्धतीने साजरा केला. धारूर तालुक्यातील चौंडी हे गाव दुर्गम भागात आहे. या ठिकाणचे बहुतांश पालक हे ऊसतोड कामगार आहेत. त्यामुळे घरची परिस्थिती बिकट असल्याने विद्यार्थ्यांसाठी वह्या पुस्तके आणि दप्तर घेणे त्यांच्यासाठी कठीण बाब असते. ही बाब ओळखून अभियंता विश्वजीत बडे यांनी आपली

◀◀ पान ३ वर

# आद्यकवी मुकुंदराज स्वामींच्या यात्रेतील पशु प्रदर्शनासाठी पाच लाखांची तरतूद

अंबाजोगाई । प्रतिनिधी

प्रतिवर्षी अंबाजोगाई येथे आद्यकवी मुकुंदराज स्वामी यात्रेनिमित्त आयोजित करण्यात येणाऱ्या पशु प्रदर्शनासाठी जिल्हा नियोजन निधीतून आता पाच लाख रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. यापूर्वी पशु प्रदर्शनासाठी दोन लाख रुपयांच्या रकमेची तरतूद होती. परंतु ही रक्कम तोकडी पडत असल्याने वाढीव रकमेसाठी केज विधानसभा मतदार संघाच्या आमदार नमिता मुंदडा यांच्या मागणीला यश आले आहे.

आद्यकवी मुकुंदराज स्वामींच्या यात्रेनिमित्त समाधीच्या दर्शनासाठी पंचक्रोशीतून मोठ्या संख्येने भाविक, दिंड्या येतात. यात्रेच्या निमित्ताने समाधी परिसरात पशुप्रदर्शन, कुस्ती स्पर्धा आदी विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येते. यापैकी पशु प्रदर्शनाचा लाभ ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना होतो. जिल्हा नियोजन निधीतून या पशु प्रदर्शनाच्या आयोजनासाठी दोन लाख रुपयांचा निधी मिळत असे. मात्र, वाढीव खर्च लक्षात घेता हा निधी अपुरा पडू लागला. त्यामुळे या निधीत वाढ करून घेण्यासाठी आ. नमिता मुंदडा यांनी प्रयत्न सुरु केले. अखेर त्यांच्या प्रयत्नांना यश आले असून जिल्हा नियोजन निधीतून या पशु प्रदर्शनासाठी आता पाच लाखांची तरतूद करण्यात आली आहे. यामुळे हे प्रदर्शन अधिक चांगल्या पद्धतीने घेण्यासाठी मदत होणार आहे. यानिमित्ताने पंचक्रोशीतील भाविक भक्त आणि शेतकऱ्यांनी आ. मुंदडा यांचे आभार मानले आहेत.

# पाटोदा तहसिलच्या नाकावर टिचुन चुंभळी येथे अवैधरित्या उत्खनन, रहिवासी घरांना तडे

पाटोदा/प्रतिनिधी सतीश गर्जे

बीड जिल्ह्यातील सर्वच माफियांचे साम्राज्याचा अस्त करु असे मुख्यमंत्र्यांनी विधानसभेत सांगितले मात्र पाटोदा तालुक्यातील गौण खनिज माफियांचा हैदोस सुरु असुन पाटोदा तहसिलच्या नाकावर टिच्चून चुंभळी येथे खाणकामातील आधुनिक मशिन आणुन अवैधरित्या उत्खनन चालु असुन या बारमुळे रहिवासी घरांना तड्डे गेले आहेत.हे विनापरवाना उत्खनन तात्काळ बंद करावे अशी मागणी चुंबळी येथिल सरपंच रेश्मा पवळ यांनी पाटोदा तहसीलदाराकडे केली आहे.





पाटोदा तालुक्यातील चुंबळी येथील गट नं मध्ये खाणकामातील आधुनिक मशिन व बाल्स्ट मशिन आणुन अवैधरित्या खाणकाम चालु असल्याप्रकरणी ते बंद करणे चुंबळी ग्रामपंचायत च्या सरपंच रेश्मा पवळ व युवा नेते प्रविण पवळ यांनी अर्ज देऊन मागणी केली आहे , मौजे चुंबळी ता . पाटोदा जि . बीड येथे अवैधरित्या तलाव खोदकाम चालु आहे . याविषयी पाटोदा तहसिल कडुन कसल्याही प्रकारची परवानगी घेतली

◀◀ पान ३ वर

### तहसीलदार व खडी क्रेशन चालकांचे अर्थ पुर्ण संबंध

**चुंभळी येथिल होणारे खाणकाम अवैधरित्या उत्खनन चालु आहे.रहिवासी घराला तडे गेले आहेत.या खरीपाची विक्री केली जाते.मात्र तहसीलदार यांकडे गांभीर्याने घ्यायला तयार नाहीत.ते उलट आम्हाला सांगतात तुम्ही बंद करा.या खडी क्रेशन चालकांचे महसूल विभागाशी अर्थपूर्ण संबंध असुन तहसीलदाराला घरी बोलावले जात आहे.**

**– प्रविण पवळ, युवा कार्यकर्ते चुंभळी.**

# वडवणीच्या पाटील गल्लीतील शिव महापुराण कथेस भाविकांची गर्दी; शुक्रवारी होणार कथेची सांगता

**वडवणी । प्रतिनिधी**

**वडवणी शहरातील मुख्य गावठाणात असलेल्या मोठा मारोती मंदिर परिसरातील पाटील गल्ली या ठिकाणी भव्य शिव महापुराण कथाचे आयोजन दि.२१ डिसेंबर २०२४ शनिवार रोजीपासून करण्यात आलेले आहे. तर या कार्यक्रमाची सांगता दि.२७ डिसेंबर २०२४ शुक्रवार रोजी होणार आहे. तरी वडवणीसह पंचक्रोशीतील महिला भगिनींसह शिवभक्त व भाविक भक्तांनी या भव्य शिव महापुराण कथेच्या दैनंदिन दुपारी १ ते ४ या वेळेत श्रवणाचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन संयोजक समस्त महिला मंडळ पाटील गल्ली वडवणी यांच्या वतीने करण्यात आले आहे.**

याबाबत अधिक माहिती अशी की, वडवणी शहरातील मुख्य गावठाणात असलेल्या मोठा मारोती मंदिर परिसरातील पाटील गल्ली या ठिकाणी भव्य शिव महापुराण कथाचे आयोजन मागील चार दिवसांपासून दि.२१ डिसेंबर २०२४ शनिवार

◀◀ पान ३ वर



# शिवसंग्रामच्यावतीने विविध मागण्यासंदर्भात अनुसूचित आयोगाचे सदस्य गोरक्ष लोखंडे यांची घेतली भेट

बीड । प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य अनुसूचित जाती जमाती आयोगाचे सदस्य (सचिव दर्जा ) ऍड मा.श्री. गोरक्ष लोखंडे यांचे काल बुधवार,दि.२५ डिसेंबर रोजी दुपारी शासकीय विश्रामगृह बीड येथे आगमन झाले असता शिवसंग्राम संघटनेच्या वतीने जिल्हा सरचिटणीस अनिल घुमरे यांनी त्यांचे स्वागत केले.याप्रसंगी त्यांच्या समवेत सामाजिक न्याय आघाडीचे जिल्हाध्यक्ष सुनील शिंदे,शहर उपाध्यक्ष शेषेराव तांबे,सतिराम



ढोले,अमरजीत घुमरे,रोहित कोलंगडे,सुशील कांबळे, विठ्ठल ढोकणे हे उपस्थित होते.यावेळी शिवसंग्राम सामाजिक न्याय आघाडीचे वतीने गायरान जमीन व अन्य विविध विषयी सविस्तर चर्चा केली. यावेळी त्यांच्या समवेत राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रदेश प्रवक्ते मा.श्री महेश शिंदे हेही उपस्थित होते.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Ashok Nagorao Khade. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - अशोक नागोराव खाडे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

cmyk



# जामीन फेटाळल्यानंतर पुणे पोलीस ॲक्शन मोडमध्ये; पूजा खेडकरला कोणत्याही क्षणी अटक?

पुणे । प्रतिनिधी

वादग्रस्त माजी आयएएस अधिकारी प्रशिक्षणार्थी अधिकारी पूजा खेडकरच्या अडचणी वाढल्या आहेत. कारण दिल्ली हायकोर्टाने पूजा खेडकर यांचा अटकपूर्व जामीन फेटाळला आहे. तसेच अटकेपासून असलेले संरक्षण देखील काढून घेतले आहे. दरम्यान पुणे पोलिसांचे एक पाठक पुण्यातील पूजा खेडकरच्या घरी दाखल झाले आहे. पूजा खेडकरचा बाणेर येथे असलेल्या निवासस्थानी पुणे पोलिसांचे पथक दाखल झाले आहे. त्यामुळे पूजा खेडकरच्या अडचणी वाढताना दिसत आहेत.




प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर प्रकरणात मोठी अपडेट समोर आली आहे. पुणे पोलीस पूजा खेडकरच्या घरी दाखल झाले आहेत. मात्र पूजा खेडकर घरी नसल्याचे समजते आहे. कदाचित त्यांचा शोध घेण्यासाठी पुणे पोलीस काही पथके वेगवेगळ्या ठिकाणी रवाना करण्याची शक्यता आहे. त्यामुळे पूजा खेडकरच्या अडचणी वाढण्याची शक्यता असून, त्यांना कोणत्याही क्षणी अटक होण्याची दाट शक्यता आहे. दिल्ली हायकोर्टाने जामीन फेटाळल्यानंतर पूजा खेडकरच्या अडचणी वाढल्या आहेत. हे प्रकरण नक्की काय आहे हे जाणून घेऊयात.

दिल्ली हायकोर्टाने बनावट आयएएस अधिकारी पूजा खेडकरचा अटकपूर्व जामीन फेटाळून लावला आहे. त्यामुळे पूजा खेडकरला मोठा धक्का मानला जात आहे. आता कोणत्याही क्षणी पूजा खेडकरला अटक होण्याची शक्यता आहे. कोर्टाने पूजा खेडकरला अटकेपासून संरक्षण दिले होते. ते संरक्षण देखील हायकोर्टाने आता काढून घेतले आहे. हे प्रकरण केवळ यूपीएससीची नव्हे तर समजायची फसवणूक करणारे आहे असे कोर्टाने म्हटल्याचे समजते आहे.

काय आहे प्रकरण?

प्रशिक्षणार्थी आयएएस पूजा खेडकर प्रकरणात दिल्ली पोलिसांनी उच्च न्यायालयात एक महत्त्वाचा रिपोर्ट सादर केला होता.यात नागरी सेवा परीक्षा २०२२ आणि २०२३ दरम्यान पुजा खेडकरने अपंगत्वाचे खोटे दाखले देऊन परीक्षा दिल्याचा दावा करण्यात आला होता. बनावट अपंगत्व प्रमाणपत्राचा वापर करून पूजा खेडकरने यूपीएससीमध्ये निवडीसाठी विशेष सवलत मिळवली. इतकेच नव्हेतर परीक्षेत कमी गुण मिळूनही सवलतींच्या आधारे ती परीक्षाही उत्तीर्ण झाली. णझडउ मध्ये ८४१ ऑल इंडिया रँक (-खठ) मिळवले. पण दिल्ली पोलिसांच्या गुन्हे शाखेने केलेल्या तपासादरम्यान तिने बनावट अपंगत्व प्रमाणपत्र बनवले असल्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

दिल्ली पोलिसांनी सादर केलेल्या स्टेटस रिपोर्टनुसार पूजा खेडकरने २०२२ आणि २०२४ मध्ये अहमदनगरच्या वैद्यकीय प्राधिकरणाकडून मिळवलेली दोन अपंगत्व प्रमाणपत्रे ही बनावट असू शकतात. पण त्यांची वैद्यकीय प्राधिकरणाकडून पडताळणी केली असता त्यांनी हे प्रमाणपत्र देण्यास नकार दिला. त्यामुळे पूजा खेडकर दावा करत असलेले अपंगत्व प्रमाणपत्र वैद्यकीय प्राधिकरणाकडून देण्यात आलेले नसावे, असे प्राधिकरणाने म्हटले.

या प्रकरणात यूपीएससीला माझ्यावर कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचा दावा पूजा खेडकरने दिल्ली हायकोर्टमध्ये केला होता. २०१९, २०२१, २०२२ मध्ये व्यक्तिमत्व चाचणीवेळी गोळा केलेल्या बायोमेट्रिक डेटाद्वारे माझी ओळख व्हेरिफाय केली आहे. आयोगाने माझ्या सर्व कागदपत्रांची पडताळणी केलेली आहे. त्यामुळे आयोगाला माझ्यावर कारवाई करण्याचा अधिकार नसल्याचे पूजा खेडकरचे म्हणणे आहे.

# शेतकऱ्याच्या घरावर ९ गोळ्या झाडल्या; अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल

पुणे: कोयत्यांची जागा हळूहळू पिस्तूलांनी घेण्यास सुरूवात केली असून, त्यातून बार उडवत दहशत देखील माजवली जात आहे. वाघोलीत पहाटेच्या सुमारास एका शेतकऱ्याच्या घरावर पहाटे गोळीबार केला आहे. तब्बल ९ गोळ्या झाडण्यात आल्याचे सांगण्यात आले आहे. या प्रकरणी लोणीकंद (वाघोली) पोलीस ठाण्यात निलेश सुभाष सातव (वय ३३) यांनी तक्रार दाखल केली आहे. त्यानूसार अज्ञाताविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.




पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, निलेश सातव हे वाघोलीतील वडजाई वस्तीत राहण्यास आहेत. ते शेतकरी असून, त्यांची मोठी शेती आहे. त्यांचा जमीन खरेदी व विक्रीचे देखील व्यवहार आहेत. कुटूंबासह तेथे राहण्यास आहेत. दरम्यान, मध्यरात्री सव्वा चारच्या सुमारास सातव कुटूंबासह घरात झोपलेले असताना त्यांच्या घराजवळ येऊन एकाने खिडकीतून त्यांच्यावर गोळी झाडली. सुदैवाने ते या गोळीबारातून बचावले गेले. गोळी त्यांना लागली नाही.

मात्र, पहाटेच्यावेळी गोळीबार झाल्याने वस्तीवर चांगलाच गोंधळ उडाला होता. अचानक गोळीबार झाल्याने दहशतीचे देखील वातावरण होते. घटनेची माहिती मिळताच वाघोली पोलीस ठाणअयाचे वरिष्ठ निरीक्षक पंडीत रेजीतवाड तसेच गुन्हे शाखा युनिटच्या पथकाने धाव घेतली. दरम्यान, सातव यांचे कोणाशी वाद किंवा जुने वाद तसेच इतर काही नाही. त्यानंतरही गोळीबार झाल्याने नेमका हा गोळीबार कसा झाला असा प्रश्न उपस्थित झाला आहे.

वाघोलीत डंपरने ९ जणांना चिरडल्याचे प्रकरण

नगर रस्त्यावरील डंपरने कामगारांना चिरडल्याप्रकरणात पोलिसांनी डंपर मालकाला अटक केली आहे. त्याने निष्काळजीपणा केल्याचा आरोप ठेवून त्याला अटक केली आहे. अनिल काटे (३९) असे अटक करण्यात आलेलया डंपर मालकाचे नाव आहे. या प्रकरणी लोणीकंद पोलिसांत गुन्हा नोंद आहे. नगर रस्त्यावरील वाघोली चौकात भरधाव डंपर चालकाने मध्याच्या नशेत फुटपाथवर झोपलेल्या मजुरांना चिरडले होते. यात तिघांचा जागीच मृत्यू झाला. तर ६ जण जखमी झालेले आहेत. यात एक तरुणी गंभीर असून, तिची प्रकृती चिंताजनक आहे.

# भीमथडी जत्रेत चोरी करणारे गजाआड; ७१ हजार रुपयांची रोकड आणि पेनड्राइव्ह चोरला, इतक्या गर्दीत कसा केला तपास?



पुणे । प्रतिनिधी


भीमथडी जत्रेमध्ये स्टॉलधारक महिलेच्या पिशवीतून चोरट्यांनी तब्बल ७१ हजार रुपयांची रोकड आणि पेनड्राइव्ह चोरुन नेला. ही चोरी तेथील सीसीटीव्ही कॅमेऱ्यामध्ये कैद झाली होती, तात्काळ शिवाजीनगर पोलिसांनी ४ जणांना अहिल्यानगर जिल्ह्यातील जामखेड तालुक्यातून अटक केली आहे. मनोज भगतसिंग पवार, संदीप संजय गौड, रतिलाल प्रेमलाल परमार, विकी साळुंखे अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. हा प्रकार सिंचननगर येथील भीमथडी जत्रेत रविवारी सायंकाळी पाच वाजता घडला होता.

फिर्यादी महिला यांचा भीमथडी जत्रेत महिला बचत गटाचा स्टॉल आहे. रविवारी जत्रेत मोठ्या प्रमाणावर गर्दी झाली होती. यावेळी त्यांनी आतल्या बाजूला ठेवलेल्या बॉक्समधून चोरट्यांनी ७१ हजार रुपयांची रोकड चोरुन नेली. ही गोष्ट त्यांच्या लगेच लक्षात आली. त्यांनी पोलिसांना याची माहिती दिली. पोलिसांनी स्टॉलवरील सीसीटीव्ही तपासले आणि तांत्रिक विश्लेषण मधून पोलिसांना या तरुणांपर्यंत पोहचता आलं आणि त्याला ताब्यात घेतलं. मिळालेल्या माहितीनुसार, तक्रारदार महिला ही मूळची वाई जवळील आझर्डे गावच्या रहिवासी आहेत. सिंचननगर येथील मैदानावर भीमथडी जत्रेमध्ये तक्रारदार महिलेने विविध वस्तू विक्रीचा स्टॉल लावला होता. रविवारी स्टॉलच्या गल्ल्यातून ७१ हजार रुपयांची रोकड आरोपी पवार, गौड, परमार, साळुंखे यांनी चोरली होती. यापूर्वी कोथरुड भागातील एका महिलेच्या स्टॉलमधील ७० हजार रुपयांची रोकड चोरीला गेली होती.

# पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी! गुरुवारी 'या' भागात राहणार पाणीपुरवठा बंद

पुणे । प्रतिनिधी

पुणेकरांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. शहरामध्ये येत्या गुरुवारी पाणीपुरवठा बंद असणार आहे. पाणीपुरवठा वितरणातील पायाभूत सुविधांच्या व्यवस्थेच्या कामासाठी पाणीपुरवठा बंद ठेवण्यात येणार असल्याची माहिती पुणे महानगरपालिकेकडून देण्यात आली आहे. तसेच भवानी पेठेतील हरकानगर जलवाहिनीवर काम करण्यात येणार असल्यामुळे देखील पाणीपुरवठ्यावर परिणाम होणार आहे. त्यामुळे गुरुवारी पुणेकरांवर पाणीकपातीचे संकट येणार आहे.



पुणे महानगरपालिकेद्वारे गुरुवार (२६ डिसेंबर) हरकानगर भवानी पेठेत काम केले जाणार आहे. भवानी पेठेतील पार्वती एमएलआर टाकीच्या पाईपलाईनवर ४५० मिमीचा बटरफ्लाय व्हॉल्व्ह बसवण्यात येणार आहे. पालिकेचे कर्मचारी ३०० मिमीचा पाईप ५०० मिमी पाईपला जोडण्याचे कामही करणार आहेत. पाणी वितरण व्यवस्थेसाठी बटरफ्लाय व्हॉल्व्ह आणि पाईप कनेक्शन जोडण्याचे काम महत्त्वाचे आहे. तेव्हा पाणीपुरवठा होणार नसल्याने पुणे महानगरपालिकेने नागरिकांना सहकार्य करण्याची विनंती केली आहे. त्यांनी पाणी जपून वापरण्याचे आवाहन केले आहे.राजकीय घडामोडी वाचण्यासाठी येथे क्लिक करा

त्यामुळे उद्या गुरुवारी (दि.२६) पाणीपुरवठा बंद राहणार आहे. तर पुढे शुक्रवारी (२७ डिसेंबर) सकाळी उशिराने कमी दाबाने पाणीपुरवठा होणार आहे. पुण्यातील पार्वती एमएआर टाकी, शंकरशेठ रोड, बुधवार पेठ, गुरुवार पेठ, काशेवाडी, क्वार्टर गेट, गंज पेठ, भवानी पेठ, नाना पेठ, लोहिया नगर, सोमवार पेठ, अरुण कुमार वैद्य स्टेडियम, लक्ष्मीनारायण टॉकीज (मागचा भाग), पार्वती दर्शन (काही भाग), मित्र मंडळ कॉलनी (काही भाग, सारस बाग, खडकमल अली, शिवाजी रोड, मुकुंद नगर, महर्षी नगर (काही भाग), टीएमव्ही कॉलनी, मीनाताई ठाकरे औद्योगिक वसाहत, अप्सरा टॉकीज, मीरा आनंद परिसर आणि श्रेयस सोसायटी या भागांमध्ये गुरुवारी पाणीपुरवठा बंद राहणार आहे.

पुणे महानगर पालिकेत नव्याने काही गावे सामील झाली आहे. हद्दीमध्ये नवीन सामील झालेल्या गावांतील मिळकत कर वसुलीला दिलेल्या स्थगितीसंदर्भात पुढील महीन्यात राज्य सरकार बैठक घेणार आहे. तसेच शहराची वाहतुक कोंडी सोडविण्यासाठी 'मोबिलीटी प्लॅन' तयार करण्यासाठी बैठक घेतली जाणार आहे, अशी माहिती अतिरीक्त आयुक्त पृथ्वीराज बी. पी. यांनी दिली. उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत बैठक पार पडली. यामध्ये ''पुणे महापालिका हद्दीत समाविष्ट केलेल्या गावांतील मिळकत कर वसुली थकली आहे. मिळकत कर आकारणीवरून ग्रामस्थांकडून तक्रारी झाल्या होत्या. त्यानंतर राज्य सरकारने या गावांतील मिळकत कर वसुलीला स्थगिती दिली आहे. याचा परीणाम महापालिकेच्या मिळकत कराच्या उत्पन्नावर होत आहे. त्याचवेळी समाविष्ट गावांतही नागरी सुविधा पुरावयच्या असल्यामुळे कर मिळाला पाहिजे, अशी मागणी उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमोर करण्यात आली आहे.

# प्रेम प्रकरणातून बायकोनेचं सुपारी देऊन खून केला,आमदार टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांच्या हत्या प्रकरणात सर्वात मोठा खुलासा

पुणे । प्रतिनिधी

भाजप आमदार योगेश टिळेकर यांचे मामा सतीश वाघ यांच्या हत्या प्रकरणात सर्वात मोठी खुलासा झालाय. सतीश वाघ यांच्या पत्नी मोहिनी वाघ यांनीच त्यांना संपवण्यासाठी सुपारी दिली असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे. या प्रकरणात गुन्हे शाखेने सतीश वाघ यांच्या पत्नीला अटक केली आहे. प्रेम प्रकरणातून सुपारी देऊन खून केल्याचे उघड झाले आहे.

प्रेम प्रकरणातून पत्नीने सतीश वाघ यांचा खून केल्याचे समोर

याबाबत अधिकची माहिती अशी की, आमदार योगेश टिळेकर यांच्या मामा सतीश वाघ यांच्या हत्याप्रकरणी त्यांच्याच बायको मोहिनी वाघ हिने सुपारी दिली होती. शेजारी राहणाऱ्या व्यक्तीसोबत मोहिनी वाघ यांचे प्रकरण होतं. या प्रेम प्रकरणात सतीश वाघ आडवे येत असल्याने त्यांना पाच लाखाची सुपारी देऊन संपवण्यात आले आहे.



याबाबतची कबुली मोहिनी वाघ यांनी पोलिसांकडे दिली आहे. त्यामुळे पोलिसांनी या प्रकरणात मोठा खुलासा केलाय.

सतीश वाघ यांच्या हत्या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या आरोपींची नावे जाणून घेऊयात...या प्रकरणी पोलिसांनी आत्तापर्यंत ५ जणांना अटक केली आहे. या प्रकरणी अक्षय जवळकर याला सुपारी देण्यात आली असल्याचे पोलीस तपासात उघड झाले आहे..

१. मोहिनी वाघ २. पवनकुमार शर्मा ३. विकास शिंदे ४ . अतिश जाधव - धाराशिव ५. अक्षय जवळकर - सुपारी देण्यात आलेला व्यक्ती.

संपूर्ण प्रकरण काय आहे?

भाजप आमदार योगेश टिळेकर याचे मामा सतीश वाघ यांचं ९ डिसेंबरला पहाटे अज्ञात व्यक्तींकडून अपहरण करण्यात आलं होतं. त्यानंतर त्यांना चारचाकी गाडीतून अज्ञान स्थळी नेण्यात आलं. सतीश वाघ यांचे अपहरण केल्यानंतर दहा ते पंधरा मिनिटांतच आरोपींनी सतीश वाघ यांचा गाडीतच खून केला असल्याची माहिती समोर आली होती. वाघ यांना तब्बल ७२ वेळा चाकूने भोसकण्यात आलं होतं. सतीश वाघ यांच्या गळयावर सर्वाधिक वार करण्यात आले असून, पाठीवर देखील वार करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले आहे. वाघ यांचा जीव गेल्यानंतर आरोपींनी मृतदेह शिंदवणे घाटातील निर्जनस्थळी फेकून दिला. सायंकाळी त्यांचा मृतदेह स्थानिक नागरिकांना आढळला. त्यांनी याबाबत उरुळी कांचन पोलिसांना माहिती दिली. पोलिसांनी घटनास्थळी पोहचून तपास सुरु केला होता.

# महापालिकेची अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर करडी नजर

पुणे : शहरातील सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी महापालिकेने भरारी पथकांची नियुक्ती केली आहे. सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता पसरवणाऱ्या नागरिकांवर महापालिकेच्या घनकचरा व्यवस्थापन विभागातर्फे दंडात्मक कारवाई केली जाते.

या कारवाईसाठी ही पथके नेमली आहेत. या पथकासाठी मंगळवारी आणखी दहा गाड्या उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत. त्यामुळे आता एकूण १८ गाड्यांद्वारे ही भरारी पथके शहराच्या विविध भागांत फिरून अस्वच्छता पसरवणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करणार आहेत.

मंगळवारी दहा नव्या गाड्यांचे लोकार्पण महापालिका आयुक्त तथा प्रशासक डॉ. राजेंद्र भोसले यांच्या हस्ते झाले. अतिरिक्त आयुक्त पृथ्वीराज बी.पी, घनकचरा व्यवस्थापन उपायुक्त संदीप कदम, परिमंडळ एकचे उपायुक्त राजू नंदकर, प्रसाद जगताप आणि मुकुंद बर्वे आदी अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



अधिकारी, कर्मचाऱ्यांनी या गाड्यांचा वापर करून नागरिकांमध्ये जागृती करावी, तसेच नियमांचे उल्लंघन करणाऱ्या नागरिकांवर दंडात्मक कारवाई करावी, अशी सूचना डॉ. भोसले यांनी केली.

चार कोटींची दंड वसुली

दरम्यान, घनकचरा व्यवस्थापन विभागांतर्गत १५ क्षेत्रीय कार्यालयांमार्फत सार्वजनिक ठिकाणी अस्वच्छता करणे, बंदी असलेल्या प्लॅस्टिकचा वापर करणे, राडारोडा टाकणे, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, कचरा जाळणे आदी विविध प्रकारच्या कृत्यांसाठी संबंधित नागरिकांकडून दंड वसूल केला जातो. याअंतर्गत दोन ऑक्टोबर २०२३ पासून आजपर्यंत एकूण ७२,७७८ प्रकरणांमध्ये चार कोटी तीन लाख ७१ हजार ९२१ रुपये दंड वसूल करण्यात आला आहे. तसेच एकूण ६,२६८ किलो प्लॅस्टिक जप्त करण्यात आले आहे.

# वाघोलीत ९ जणांना चिरलेल्या डंपर चालकासह मालकाला ठोकल्या बेड्या; दारू पीत असल्याची माहिती असतानाही ठेवलं कामावर अन्...

पुणे । प्रतिनिधी

पुण्यातील वाघोली केसनंद परिसरामध्ये रविवारी रात्री बारा ते एक वाजण्याच्या सुमारास भीषण अपघात झाला. अमरावतीवरून कामासाठी पुण्यात आलेल्या ९ जणांना डंपरने चिरडलं. पुण्यात काम शोधण्यासाठी आलेल्या या कामगारांनी फुटपाथवर आसरा घेतला होता. पण भरधाव वेगाने आलेल्या डंपरने ९ जणांना चिरडले. यामध्ये ३ जणांचा मृत्यू झाला आहे. तर ६ जण गंभीर जखमी झाले आहेत. तर मृतांमध्ये एक आणि दोन वर्षांच्या चिमुकल्यांचा समावेश आहे. या प्रकरणात डंपर चालकासह मालकाला देखील अटक करण्यात आली आहे.

या अपघात प्रकरणात डंपरवर ठेवलेला चालक दारू पीत असल्याची माहिती असताना देखील त्याला डंपर चालवण्यासाठी दिल्याने वाघोलीतील डंपरच्या मालकाला वाघोली पोलिसांनी बेड्या ठोकल्या आहेत. रविवारी मध्यरात्री मद्यधुंद डंपरचालकाने नऊ जणांना चिरडले होते. त्यातील तीन जणांचा अपघातात मृत्यू झाला होता, तर सहा जण गंभीर जखमी झाले होते. अनिल काटे असे अटक केलेल्या डंपरमालकाचे नाव आहे. पोलिसांनी अनिल काटे याला वाघोली पोलिस ठाण्यात चौकशीसाठी बोलावण्यात आले होते. तपासात अनिल काटे या डंपरचालकाला दारू पिण्याचे व्यसन होते, हे माहिती होते. जेव्हा डंपरचालक डंपर घेऊन चालला होता, तेव्हा काटे याला याबाबत माहिती होती. तसेच, चालकाने डंपरमधील माल आव्हाळवाडीत उतरवला होता. तपासात काटे या चालकाने डंपर घेऊन जाताना दारू प्यायली होती का नव्हती, याबद्दल माहिती नसल्याचेही सांगितले आहे. चालक दारू पितो याची माहिती असताना देखील त्याला वाहन चालवण्यासाठी देण्यात आलं होतं.

याबाबत पोलिसांनी सांगितले की, एकतर मालकाने मद्यपी डंपरचालकाला गाडी चालवण्यासाठी द्यायला नको होती. तसेच, त्याला नोकरीवर ठेवताना गाडी चालवताना मद्य पिऊन गाडी चालवायची नाही, असे नोकरीवर ठेवण्यापूर्वी सांगणे अपेक्षित होतं. त्यामुळे याप्रकरणी डंपरमालकाला अटक करण्यात आली आहे.

मृत झालेल्यांची नावं

१. विशाल विनोद पवार वय २२ वर्ष, रा. अमरावती मूळ जिल्हा २. वैभवी रितेश पवार वय १ वर्ष ३. वैभव रितेश पवार वय २ वर्ष जखमी झालेल्यांची नावं १. जानकी दिनेश पवार, २१ वर्षे २. रिनिशा विनोद पवार १८ ३. रोशन शशादू भोसले, ९ वर्षे ४. नगेश निवृत्ती पवार, वय २७ वर्षे५. दर्शन संजय वैराळ, वय १८६. आलिशा विनोद पवार, वय ४७ वर्षेनेमकं काय घडलं?

मद्यधुंद अवस्थेत असलेल्या डंपर चालकाने फुटपातवर झोपलेल्या नऊ जणांना चिरडलं. यामध्ये तिघांचा जागेवरच मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये दोन लहान मुलांचा समावेश आहे. तर या अपघातामध्ये सहा जण गंभीर जखमी झाले आहेत. याप्रकरणी डंपर चालक गजानन शंकर तोट्रे, २६ वर्षे रा. नांदेड याला अटक केली असून त्याच्या विरोधात मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. आरोपी गजानन हा मुळचा नांदेडचा आहे, अपघातातील मृत कामगार हे मुळचे अमरावतीतील आहे. ही घटना रात्री बारा ते एक वाजण्याच्या सुमारास घडली आहे. जखमी कामगारांवरती सध्या ससून रुग्णालयामध्ये उपचार सुरू आहेत. हे सर्व कामगार आहेत रविवारी रात्री ते अमरावतीवरून पुण्यात कामासाठी आले होते.

# ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्रासाठी दोन महिने मुदतवाढ

पुणे । प्रतिनिधी

आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातून (ईडब्ल्यूएस) या गटातून मराठा समाजातील मुलांनी इंजिनिअरिंगला प्रवेश मिळाला. दरम्यान, राज्य शासनाने मराठा समाजातील मुलांना ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्र देणे बंद केले. त्याऐवजी सामाजिक व आर्थिक मागास प्रवर्ग अर्थात एसईबीसी' प्रमाणपत्र देण्यास सुरुवात झाली. आता प्रवेश देणाऱ्या राज्य सामाईक प्रवेश परीक्षा कक्षाने (सीईटी सेल) विद्यार्थ्यांकडून ईडब्ल्यूएस' प्रमाणपत्राची सक्ती केली होती.

त्यामुळे या विद्यार्थ्यांचे प्रवेश अडचणीत आले होते. या पार्श्वभूमीवर मराठा समाजातील विद्यार्थ्यांना आवश्यक जात प्रमाणपत्र सादर करण्यासाठी दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्यात येईल, असे आश्वासन मंत्री चंद्रकांत पाटील यांनी नुकतेच दिले. त्यामुळे या विद्यार्थ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

याबाबत दैनिक प्रभात'च्या १३ डिसेंबर २०२४ च्या अंकात शेकडो मराठा विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा घोळ असे वृत्त प्रसिध्द करण्यात आले होते. तहसील कार्यालयांकडून खुल्या प्रवर्गातील विद्यार्थ्यांना दोन प्रकारचे ईडब्ल्यूएस प्रमाणपत्र शैक्षणिक आणि नोकरीच्या दृष्टीने देण्यात येत होते. त्यामध्ये एक प्रमाणपत्र हे राज्य सरकारने दिलेल्या नमुन्यानुसार, तर दुसरे प्रमाणपत्र हे केंद्र सरकारच्या नमुन्यामध्ये देण्यात येत होते. दोन्ही प्रकारची प्रमाणपत्रे काढण्यासाठी कागदपत्रे एकसारखीच द्यावी लागतात. विद्यार्थी हे प्रमाणपत्र केंद्र किंवा राज्याच्या गरजेप्रमाणे शैक्षणिक किंवा नोकरीच्या कामासाठी वापरत होते.

मात्र, गेल्या काही महिन्यांपासून मराठा समाजातील विद्यार्थ्यांना ईडब्ल्यूएसचे प्रमाणपत्र देणे बंद केले असून, त्याऐवजी एसईबीसीचे प्रमाणपत्र देण्यात येते. त्यामुळे विद्यार्थांची अडचण झाली असून, सीईटी सेलने मात्र ईड्ब्लूएसच्या प्रमाणपत्राचा हट्ट धरला आहे. त्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या प्रवेशांवर रद्द होण्याची टांगती तलवार होती. याप्रश्नी विद्यार्थ्यांच्या पालकांनी जिल्हाधिकारी कार्यालयाकडेसुध्दा दाद मागितली होती.

याप्रश्नी अधिवेशानत प्रश्न उपस्थित करण्यात आला होता. यावेळी मंत्री पाटील यांनी सांगितले की, या विद्यार्थ्यांना राज्य सरकारकडून दोन महिन्यांचा अतिरिक्त कालावधी देण्यात येणार असून, कोणत्याही परिस्थितीत ते प्रवेश प्रक्रियेपासून वंचित राहणार नाहीत. कोणतीही अडचण आल्यास मुख्यमंत्री आणि दोन उपमुख्यमंत्र्यांशी बोलून समस्येवर तोडगा काढला जाईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

cmyk